डिजीटल ई-मासिक

# महापशुधन वार्ता

वर्ष १ ले, अंक ५ वा

माहे सप्टेंबर-२०२५



प्रकाशक: पशुसंवर्धन विभाग, महाराष्ट्र राज्य

महाराष्ट्र शासन
पशुसंवर्धन आयुक्तालय,
महाराष्ट्र राज्य, पुणे - ४११०६७

डिजीटल ई-मासिक

महापशुधन वार्ता

वर्ष १ ले, अंक ५ वा
माहे सप्टेंबर-२०२५

संपादक
**डॉ. प्रशांत भड**
उपआयुक्त पशुसंवर्धन
(पशुधन व कुक्कुट)
पशुसंवर्धन आयुक्तालय,औंध, पुणे-६७

संकलन, संपादन, मांडणी व सजावट :
**श्री. संतोष पवार,** पशुधन पर्यवेक्षक

## पशुसंवर्धन विभाग

राज्यस्तरीय कॉल सेंटर
संपर्क क्र : १९६२

पत्रव्यवहारासाठी पत्ता :
**महापशुधन वार्ता कक्ष**
**पसं-१३, पशुसंवर्धन आयुक्तालय,**
**महाराष्ट्र राज्य,**
**औंध, पुणे - ४११००७**


Email:
mahapshudhanvarta@gmail.com

## पशुसंवर्धन विभाग

मागील अंक वाचण्यासाठी खालील
क्युआर कोड स्कॅन करा

या अंकातील लेखांमध्ये व्यक्त करण्यात आलेल्या मतांशी संपादक व पशुसंवर्धन विभाग सहमत असेलच, असे नाही ( पुणे न्यायकक्षेत ).

## ❖ या अंकात...







- ❖ ना. पंकजा मुंडे यांना **'कोहिनूर ऑफ इंडिया' अवॉर्ड**
- ❖ नद्यांचे प्रदूषण कमी करण्यासाठी ना. पंकजा मुंडे यांचा पुढाकार
- ❖ प्राण्यांसाठीच्या सुपर स्पेशालिटी रुग्णवाहिकेचे मा. पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांच्या हस्ते लोकार्पण
- ❖ **पशुपालकांच्या समग्र विकासाचा संकल्प करुया:** मा. आयुक्त पशुसंवर्धन
- ❖ राज्यामध्ये लाळखुरकुत प्रतिबंधक लसीकरण मोहिमेस सुरुवात
- ❑ **राष्ट्रीय गोपाळ रत्न पुरस्कार २०२५:** मा. आयुक्त पशुसंवर्धन
- ❑ **पशुप्रजाती संवर्धन पुरस्कार-२०२५:** मा. अतिरिक्त आयुक्त पशुसंवर्धन
- ❖ बैल पोळ्यानिमित्त सेल्फी विथ सर्जा-राजा
- ❖ **बैलाला सर्पदंश:** उपचारासाठी धावले 'आरोग्य' व 'पशुसंवर्धन॰
- ❖ **कासवाला मिळाले जीवदान:** अन्ननलिकेत अडकलेल्या गळावर शस्त्रक्रिया यशस्वी
- ❖ पशुसंवर्धन विभागामार्फत सरीसृप वर्गीय प्राण्यांसाठी स्वास्थतपासणी व पशुवैद्यकीय सेवा
- ❖ पंजाबमधील १०० महिला सरपंचांनी केली महाराष्ट्रातील एनएलएम प्रोजेक्टची पाहणी
- ❖ कोल्हापुरात स्वच्छ-सुंदर गोठा अभियान
- ❖ फिलीपिन्सच्या प्रतिनिधींची हिरापुर (गेवराई, बीड) पशुवैद्यकीय केंद्राला भेट
- ❖ 'महापशुधन वार्ता' च्या चौथ्या अंकाचे प्रकाशन
- ❖ प्रसारमाध्यमांनी घेतलेल्या नोंदी


### लेख


- ❑ **खिलार:** महाराष्ट्राच्या पशुधनाचा मानबिंदू
- ❑ कुक्कुटपालन प्रशिक्षणातून ग्रामीण महाराष्ट्राच्या विकासाला नवी दिशा
- ❑ **परसातील कुक्कुटपालन:** शाश्वत उत्पन्नाचे किफायतशीर साधन
- ❑ दुभत्या गायींसाठी लिक्वीड कॅल्शियम की खनिज मिश्रण
- ❑ शासकीय पशुपैदास प्रक्षेत्र, ताथवडे प्रक्षेत्रावर विक्रमी चारा उत्पादन
- ❑ जनावरांना औषधे देतांना घ्यावयाची काळजी
- ❑ पशुधनातील गोचीडांचे प्रादुर्भाव व त्यांचे निर्मूलन
- ❑ कहाणी लम्पी चर्मरोगाची (भाग-२)
- ❑ पशुसंवर्धन आयुक्तालय: स्वातंत्र्यदिन समुहचित्र


या अंकातील लेखांमध्ये व्यक्त करण्यात आलेल्या मतांशी संपादक व पशुसंवर्धन विभाग सहमत असेलच, असे नाही ( पुणे न्यायकक्षेत ).

# ना. पंकजा मुंडे यांना 'कोहिनूर ऑफ इंडिया'अवॉर्ड

## लोकमत वृतपत्र समुहाने केला सन्मान; लंडन येथे दिमाखदार सोहळा संपन्न




पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजा मुंडे यांना त्यांच्या खात्यातील उत्कृष्ट कामाबद्दल लोकमत वृतपत्र समुहाच्या वतीने 'कोहिनूर ऑफ इंडिया' पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. लंडन येथे दिमाखदार सोहळ्यात हा पुरस्कार देण्यात आला.

लोकमत वृतपत्र समूहाच्या वतीने लंडन येथे आयोजित करण्यात आलेल्या 'लोकमत ग्लोबल इकॉनॉमिक कन्व्हेन्शन' ही जागतिक परिषद पार पडली. ज्यांनी आपल्या कार्यातून देशाचे नाव जागतिक स्तरावर उज्ज्वल केले आहे अशा व्यक्तींना लोकमत वृतपत्र समूहाने 'कोहिनूर ऑफ इंडिया' या पुरस्काराने सन्मानित करण्याचे ठरवले होते.

ना. पंकजा मुंडे यांनी आपल्या कुशल व अभ्यासू मार्गदर्शनखाली पर्यावरण व पशुसंवर्धन विभागात उल्लेखनीय काम करून एक नवा आयाम प्रस्थापित केल्याबद्दल त्यांचा या पुरस्काराने गौरव करण्यात आला. लोकमत वृतपत्र समूहाचे अध्यक्ष विजय दर्डा यांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. यावेळी लोकमत चे एडिटर इन चीफ राजेंद्र दर्डा उपस्थित होते.

**चर्चासत्रातही सहभाग:** महिलांनी मूल्यसंस्कार, देशाची समृध्द संस्कृती आणि वारसा जपत उद्योग, व्यवसाय आणि अर्थव्यवस्थेत मोलाचे योगदान दिले आहे, या विषयावर परिषदेत एक चर्चासत्र आयोजित करण्यात आले होते, यातही ना. पंकजा मुंडे यांनी सहभाग घेत आपली सडेतोड भूमिका मांडली. मा. पंतप्रधान नरेंद्र मोदी, मा. केंद्रीय गृह तथा सहकार मंत्री अमित शाह तसेच मा. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिलेल्या संधीमुळे राज्याच्या विकासात्मक प्रक्रियेत मला योगदान देता येत आहे. आजपर्यत केलेल्या कार्याचा आणि माझ्या पाठिशी ठामपणे उभे राहणाऱ्या प्रत्येकाचा हा सन्मान आहे, असं ना. पंकजा मुंडे यांनी यावर प्रतिक्रिया देताना म्हटलं आहे.

# नद्यांचे प्रदूषण कमी करण्यासाठी ना. पंकजा मुंडे यांचा पुढाकार नदी पुनरुज्जीवनाचे मुख्यमंत्र्यासमोर केले विस्तृत सादरीकरण



राज्यातील नद्यांच्या पुनरुज्जीवनासाठी "महाराष्ट्र राज्य नदी पुनरुज्जीवन प्राधिकरण (MSRRA)" स्थापन करण्याची कार्यवाही सुरु करण्यास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज मंजुरी दिली. राज्यातील नद्यांचे प्रदूषण कमी करून त्यांचे पुनरुज्जीवन साध्य करण्याच्या दृष्टीने एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलत, नद्यांचे नैसर्गिक प्रवाह राखण्यासाठी आणि पुनरुज्जीवनासाठी हे प्राधिकरण विकासात्मक भूमिका बजावेल, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी केले.

मुख्यमंत्री फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात यासंदर्भात बैठक झाली. या बैठकीला पर्यावरण आणि हवामान बदल आणि पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे, मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव अश्विनी भिडे, पर्यावरण विभागाच्या सचिव जयश्री भोज, वातावरणीय बदल कक्षाचे संचालक अभिजीत घोरपडे तसेच सल्लागार संस्थेच्या नमिता रेपे उपस्थित होत्या.

प्राधिकरणाच्या रचना व संकल्पनेचे पर्यावरण मंत्री श्रीमती पंकजा मुंडे यांनी विस्तृत सादरीकरण केले. नदी पुनरुज्जीवनासाठी डीपीआर व खोरे व्यवस्थापन योजना मंजूर करणे, अतिक्रमण, वीज, भूसंपादन यासंबंधी अडचणी सोडवणे, राष्ट्रीय योजनांसाठी निवडक प्रकल्पांची शिफारस करणे इत्यादी महत्त्वपूर्ण कार्ये प्राधिकरणाद्वारे करण्यात येणार असल्याचे त्यांनी यावेळी नमूद केले.

प्राधिकरणाचे अध्यक्ष मुख्यमंत्री तर पर्यावरण मंत्री उपाध्यक्ष असणार आहेत. यासोबतच पर्यावरण मंत्री यांच्या अध्यक्षतेखाली राज्यस्तरीय कार्यकारी समिती कार्यरत राहील. या राज्यस्तरीय समितीमध्ये तांत्रिक तज्ञ, वित्तीय व कायदेशीर सल्लागार, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे (MPCB) सदस्य सचिव तसेच आयआयटीसारख्या प्रतिष्ठित संस्थांतील तज्ज्ञ सदस्य यांचा समावेश असेल.

राज्यातील नद्यांचे शाश्वत पुनरुज्जीवन साध्य करण्यासाठी हे प्राधिकरण व्यापक काम करणार आहे. दैनंदिन कामकाजासाठी एमपीसीबीचे सदस्य सचिव प्रमुख असलेले एक समर्पित सचिवालयही स्थापन करण्यात येणार आहे.

# प्राण्यांसाठीच्या सुपर स्पेशालिटी रुग्णवाहिकेचे मा. पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांच्या हस्ते लोकार्पण



'समस्त महाजन' या संस्थेच्या 'अर्हम अनुकंपा प्रोजेक्ट' अंतर्गत मुंबई आणि मुंबई उपनगर परिसरातील गोमाता आणि इतर प्राण्यांच्या सेवेसाठी असलेल्या सुपर स्पेशालिटी प्राणी रुग्णवाहिकेचे लोकार्पण पर्यावरण व वातावरणीय बदल, पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांच्या हस्ते करण्यात आले. या उद्घाटनप्रसंगी संस्थेचे व्यवस्थापकीय विश्वस्त गिरीश शहा, विश्वस्त परेश शहा, तसेच समस्त जैन समाजातील अनेक बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. 'समस्त महाजन' या संस्थेच्या अर्हम अनुकंपा प्रोजेक्टअंतर्गत सुरू करण्यात आलेली ही प्रगत तंत्रज्ञानाने सुसज्ज रुग्णवाहिका मुंबई, ठाणे, आणि पालघर या भागांतील गोमाता व इतर जखमी प्राण्यांवर उपचार करणार आहे.

समाजातील विविध गोशाळांमधील जखमी, आजारी गायी व इतर प्राण्यांना दवाखान्यात नेण्यासाठी हायड्रोलिक रुग्णवाहिका उपयुक्त ठरणार आहे. प्राणीमात्रांचे दुःख निवारणासाठी हा उपक्रम महत्त्वाचा आहे. प्राणीमित्रांची सेवा हेच मुख्य ध्येय ठेवून भविष्यातही हा उपक्रम अधिक व्यापक व्हावा, अशी अपेक्षा पशुसंवर्धन मंत्री श्रीमती पंकजा मुंडे यांनी यानिमित्ताने व्यक्त केली.

'समस्त महाजन' ही संस्था गेल्या अनेक वर्षांपासून प्राणी कल्याण, पर्यावरण संवर्धन आणि समाजसेवा क्षेत्रात कार्यरत आहे. संस्थेकडून मोफत प्राणी उपचार, आहार वाटप, वृक्षारोपण, तसेच नैसर्गिक आपत्तीग्रस्तांना मदत अशी विविध कार्ये नियमितपणे केली जात आहेत. संस्थेच्या वतीने आतापर्यंत गोमाता व इतर अशा ९२,५०० जखमी प्राण्यांवर मागील ३६ महिन्यांत उपचार करण्यात आले आल्याची माहिती संस्थेच्या संचालकांतर्फे देण्यात आली .



'समस्त महाजन' या संस्थेच्या 'अर्हम अनुकंपा प्रोजेक्ट' अंतर्गत मुंबई आणि मुंबई उपनगर परिसरातील गोमाता आणि इतर प्राण्यांच्या सेवेसाठी असलेल्या सुपर स्पेशालिटी प्राणी रुग्णवाहिकेचे लोकार्पण पर्यावरण व वातावरणीय बदल, पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांच्या हस्ते करण्यात आले.



# पशुपालकांच्या समग्र विकासाचा संकल्प करुया: मा. आयुक्त पशुसंवर्धन

**पशुसंवर्धन आयुक्तालय, औंध, पुणे-४११०६७**

राज्यातील पशुपालकांच्या विकासासाठी पशुसंवर्धन विभाग नेहमीच प्रयत्नशील राहिला आहे. या प्रयत्नांना आणखी व्यापक करुन पशुपालकांच्या समग्र विकासाचा संकल्प स्वातंत्र्यदिनी आपण करुयात, असे आवाहन मा. आयुक्त पशुसंवर्धन डॉ. प्रवीणकुमार देवरे (भा.प्र.से.) यांनी ७९ व्या भारतीय स्वातंत्र्य दिनानिमित्त विभागातील अधिकारी व कर्मचारी वर्गाला शुभेच्छा देताना केले. औंध येथील पशुसंवर्धन आयुक्तालयात मा. आयुक्त पशुसंवर्धन डॉ. प्रवीणकुमार देवरे (भा.प्र.से.) यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी डॉ. श्यामकांत पाटील (सहआयुक्त पशुसंवर्धन, (मुख्यालय)), डॉ. समीर बोरकर (प्रादेशिक सहआयुक्त पशुसंवर्धन,पुणे विभाग) सहआयुक्त पशुसंवर्धन डॉ. याहयाखान पठाण, श्रीमती सुषमा जाधव सहसंचालक (सांख्यिकी), डॉ. प्रशांत भड, उपआयुक्त पशुसंवर्धन (म. गो. प्र. अ. तथा पशुधन व कुक्कुट), डॉ. शिवाजी पवार (उपआयुक्त पशुसंवर्धन, जिल्हा प्राणी कल्याण मंडळ), डॉ. सुनील लहाने (उपआयुक्त पशुसंवर्धन, रोग अन्वेषण विभाग) उपस्थित होते.



पशुसंवर्धन आयुक्तालयात भारताचा ७९ वा स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा





# पशुसंवर्धन आयुक्तालयात भारताचा ७९ वा स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा

सर्व छायाचित्रे: आकाश चव्हाण, पसं-१३






# राज्यामध्ये लाळखुरकुत प्रतिबंधक लसीकरण मोहिमेस सुरुवात

मा. सचिव (पदुम) महाराष्ट्र राज्य डॉ. रामास्वामी एन. यांचे उपस्थितीत व शुभहस्ते नाशिक जिल्ह्यातील इगतपुरी येथील डांगी फार्मवर केंद्र पुरस्कृत लाळखुरकत प्रतिबंधक लसीकरणाच्या सातव्या फेरीचा शुभारंभ करण्यात आला. यावेळी प्रादेशिक सहआयुक्त पशुसंवर्धन डॉ. बी. आर. नरवाडे, जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त डॉ. प्रशांत धर्माधिकारी तसेच मुंबई पशुवैद्यक महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. इंगोले, प्राध्यापक डॉ. रवींद्र झेंडे, डॉ. महादेव सवाने, सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन डॉ. मिलिंद भणगे, डॉ. नेहते, डॉ. पजई, प्रक्षेत्र व्यवस्थापक डॉ. कापडणीस आदी उपस्थित होते.



नाशिक जिल्ह्यातील इगतपुरी येथील डांगी फार्मवर केंद्र पुरस्कृत लाळखुरकत प्रतिबंधक लसीकरणाच्या सातव्या फेरीचा शुभारंभ करताना मा. सचिव (पदुम), महाराष्ट्र राज्य डॉ. रामास्वामी एन.

१०० टक्के केंद्रपुरस्कृत पशुस्वास्थ्य व रोगनियंत्रण कार्यक्रमांतर्गत ही फेरी दि. १४.०८.२०२५ ते २७.०९.२०२५ या कालावधीत राज्यात राबविण्याचे सुनिश्चित केले आहे. लसीकरण करताना प्राधान्याने या अगोदर रोग प्रादुर्भाव झालेल्या, संकरीत गोवर्गीय पशुधन जास्त असलेल्या व सिरोमॉनिटरिंगसाठी निवडलेल्या गावामध्ये प्राधान्याने लसीकरण करण्यात येणार आहे. सदरची फेरी ३० दिवसात पूर्ण करून उर्वरित १५ दिवसात लसीकरणापासून वंचित पशुधनास लसीकरण व बुस्टर लसमात्रा देण्यात येणार आहे.

# राज्यामध्ये लाळखुरकुत प्रतिबंधक लसीकरण मोहिमेच्या सातव्या फेरीस सुरुवात




पशुसंवर्धन विभागाचे अतिरिक्त आयुक्त डॉ. शितलकुमार मुकणे यांनी कोल्हापूर जिल्हा दौऱ्यावर असताना लाळखुरकत लसीकरण फेरी ७ कामकाजाबाबत पाहणी केली. तसेच पशुपालकाना व संस्थाप्रमुख याना मार्गदर्शन केले.



दि.१७ ऑगस्ट २०२५ रोजी रोग अन्वेषण विभाग व पशुसंवर्धन आयुक्तालयातील रोग नियंत्रण कार्यासनाचे सहाय्यक आयुक्त डॉ. भगतसिंग कदम, डॉ. प्रदिप रणवरे व डॉ. संजय पवार यांनी सोलापूर जिल्ह्यात TMVP अक्कलकोट व TMVP अकलूज येथील कामकाजाची आणि LHDCP मोबाइल व्हॅनची पाहणी करुन मार्गदर्शन केले. सांगोला येथील जनावरांच्या प्रसिद्ध बाजाराचे सर्वेक्षण व रूट ट्रेसिबिलिटी स्टडी करण्यात आला. एकंदरीत १६ व १७ ऑगस्ट सोलापूर दौऱ्यादरम्यान लम्पी स्कीन डिसीज (LSD) नियंत्रण व लाळखुरकुत प्रतिबंधकात्मक लसीकरण फेरी ७ च्या अनुषंगाने करण्यात आलेल्या तयारीचा सखोल आढावा घेण्यात आला.




# लाळखुरकुत प्रतिबंधक लसीकरण मोहिमेच्या सातव्या फेरीस सुरुवात

अहिल्यानगरमधील पांजरपोळ गोरक्षण संस्था या गोशाळेत मा. ना. शेखर मुंदडा अध्यक्ष, गोसेवा आयोग यांचे प्रमुख उपस्थितीत लाळखुरकुत फेरी-७ अंतर्गत लसीकरण मोहीम सुरू करण्यात आली. यावेळी पशुसंवर्धन विभागाचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.







मा. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते १०० दिवस कार्यालयीन सुधारणा उपक्रमात पुणे विभागातून प्रथम क्रमांक मिळवलेल्या कार्यालयांचा सत्कार करण्यात आला. मा.प्रादेशिक सह आयुक्त पशुसंवर्धन, पुणे विभाग पुणे, डॉ. समीर बोरकर यांना विभागातून प्रथम क्रमांकासाठी मा. ना. अजित पवार यांच्या हस्ते गौरवण्यात आले.



नागपूर जिल्ह्यात सर्वाधिक (१८९०) कृत्रिम रेतन करून गोपालकांना उत्तम सेवा दिल्याबद्दल मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. विनायक महामुनी (भा.प्र.से.) जिल्हा परिषद, नागपूर यांच्या हस्ते डॉ. अविनाश ब्राम्हणकर यांना पशुसंवर्धन विभागातील उत्कृष्ट अधिकारी म्हणून गौरविण्यात आले

# राष्ट्रीय गोपाळ रत्न पुरस्कार २०२५







## महाराष्ट्रातील दुग्धसंस्था, पशुपालक व कृत्रिम रेतन सेवादातांसाठी एक संधी

भारत सरकारकडून देण्यात येणाऱ्या पुरस्कारांच्या संपूर्ण यंत्रणेत गुणवत्ता, निष्पक्षता, पारदर्शकता, लोकसहभाग, सहजता, कार्यक्षमता आणि तंत्रज्ञानाचा वापर यावर लक्ष केंद्रित करून विश्वासार्हता निर्माण करण्यासाठी, गृह मंत्रालयात स्थापन केलेल्या केंद्रीय पुरस्कार समर्थन युनिट (CASU) ने पुरस्कारांचे समीक्षण व पुनर्रचनेचे कार्य हाती घेतले आहे. त्यानुसार, सन २०२१ पासून ऑनलाइन पोर्टलद्वारे अर्ज स्वीकारून राष्ट्रीय गोपाळ रत्न पुरस्कार प्रदान केले जात आहेत. शिवाय, सन २०२२ पासून NGRA केंद्रिय गृह मंत्रालयाच्या पुरस्कार पोर्टलशी म्हणजेच https://awards.gov.in सह एकत्रित करण्यात आले असून, या पोर्टलद्वारेच ऑनलाइन अर्ज मागवले जात आहेत.



**मा. डॉ. प्रवीणकुमार देवरे** (भा.प्र.से.)
आयुक्त पशुसंवर्धन, महाराष्ट्र राज्य,
पुणे-६७

भारतातील स्थानिक गोवंशीय जातींचा राष्ट्रीय अर्थव्यवस्थेच्या विकासात महत्वाचा सहभाग आहे. मात्र, स्थानिक जातींच्या विकास आणि संवर्धनासाठी कोणताही विशिष्ट कार्यक्रम नसल्यामुळे, त्यांची संख्या कमी होत असून, कामगिरी क्षमतेपेक्षा कमी आहे. म्हणूनच, त्यांच्या विकास व संवर्धनासाठी एक शास्त्रोक्त कार्यक्रम सुरू करण्याची गरज होती. माननीय पंतप्रधानांच्या नेतृत्वाखाली, देशात पहिल्यांदाच डिसेंबर २०१४ मध्ये "राष्ट्रीय गोकुळ मिशन" नावाचा एक नवीन उपक्रम सुरू करण्यात आला, ज्याचा उद्देश स्थानिक गोवंशीय जातींचे संवर्धन व विकास करणे आहे.

कोणत्याही गोवंशीय प्रजनन कार्यक्रमाचे उद्दिष्ट गायींचे आणि म्हशींचे अनुवांशिक सुधारणा आहे आणि हे ध्येय साध्य करण्यासाठी, मजबूत कृत्रिम रेतन (AI) सेवा असणे आवश्यक आहे. २० व्या पशुधन गणनेनुसार, देशात ३०२ दशलक्ष गोवंशीय प्राणी आहेत. सध्या सरासरी उत्पादकता प्रती पशु प्रती दिन ५ किलो आहे. त्यांची सरासरी कमी उत्पादकता ही चिंतेची बाब आहे. किमान उत्पादकतेच्या स्थितीतून कमाल उत्पादकतेच्या स्थितीत आणण्यात कृत्रिम रेतन तंत्रज्ञांची भूमिका महत्त्वाची आहे. म्हणूनच, शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करण्याच्या प्रमुख कार्यक्रमाचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी, १००% कृत्रिम रेतनासाठी कठोर परिश्रम करणारे सर्वोत्तम कृत्रिम रेतन तंत्रज्ञ / सेवादाता ओळखण्याची आवश्यकता आहे. त्याचप्रमाणे, गावपातळीवर, सुमारे २ लाख दुग्ध सहकारी संस्था आणि दूध उत्पादक कंपन्या ग्रामीण विकासाचे सारथ्य करत आहेत, कारण त्यांचे सदस्य सुमारे २ कोटी दुग्धोत्पादक आहेत. शेतकऱ्यांना त्यांच्या उत्पादनासाठी बाजारपेठ उपलब्ध करून देण्यासाठी आणि त्यांना किफायतशीर भाव मिळविण्यात मदत करण्यासाठी ग्रामीण संस्था म्हणून ते काम करतात.




२०२५ पासून, विभागाने राष्ट्रीय गोपालरत्न पुरस्कारांतर्गत हिमालयीन राज्ये (उत्तराखंड, जम्मू -काश्मीर, लडाख व हिमाचल प्रदेश) यांचा समावेश राष्ट्रीय गोपालरत्न पुरस्कारांतर्गत तिन्ही NER श्रेणींमध्ये केला आहे, जेणेकरून हिमालयीन राज्यांमध्ये NER च्या बरोबरीने दुग्धविकास उपक्रमांना प्रोत्साहन आणि चालना मिळेल. म्हणून, राष्ट्रीय गोपालरत्न पुरस्कार (NGRA) २०२५ वरील तीन श्रेणींमध्ये हिमालयीन राज्यांसह ईशान्य प्रदेश (NER) साठी प्रथम, द्वितीय, तृतीय आणि एक विशेष पुरस्कार प्रदान करेल. NGRA २०२५ मध्ये सर्वोत्कृष्ट दुग्ध उत्पादक आणि सर्वोत्कृष्ट DCS / FPO / MPCS या पहिल्या दोन श्रेणींसाठी एक गुणवत्ता प्रमाणपत्र, एक स्मृतिचिन्ह आणि आर्थिक पुरस्कार असेल.

**पुरस्कार श्रेणी**

i. देशी गायी/म्हशींच्या जातींचे पालन करणारे सर्वोत्तम दुग्ध उत्पादक.
ii. सर्वोत्तम दुग्ध सहकारी संस्था / दूध उत्पादक कंपनी / दुग्ध उत्पादक संघटना.
iii. सर्वोत्तम कृत्रिम रेतन तंत्रज्ञ (AIT).

- रु. ५,००,०००/- (फक्त पाच लाख रुपये) -प्रथम क्रमांक
- रु. ३,००,०००/- (फक्त तीन लाख रुपये) -दुसरा क्रमांक आणि
- रु. २,००,०००/- (फक्त दोन लाख रुपये) -तिसरा क्रमांक
- रु. २,००,०००/- (फक्त दोन लाख रुपये) - ईशान्य प्रदेश (एनईआर) आणि हिमालयीन राज्यांसाठी (उत्तराखंड, जम्मू आणि काश्मीर, लडाख आणि हिमाचल प्रदेश) विशेष पुरस्कार.
- सर्वोत्तम कृत्रिम गर्भाधान तंत्रज्ञ (एआयटी) श्रेणीच्या बाबतीत, राष्ट्रीय गोपाळ रत्न पुरस्कार-२०२५ मध्ये केवळ गुणवत्तेचे प्रमाणपत्र आणि स्मृतिचिन्ह दिले जाईल. कृत्रिम गर्भाधान तंत्रज्ञ (एआयटी) श्रेणीमध्ये रोख पुरस्कार दिला जाणार नाही.

**उद्दिष्टे:**

(i) शेतकऱ्यांना वैज्ञानिक पद्धतींनी देशी दुभत्या जनावरांची उत्पादकता वाढवण्यास प्रेरित करणे.

(ii) सहकारी व दूध उत्पादक कंपन्यांना पुढे जाण्यास आणि त्यांच्यामध्ये स्पर्धात्मक भावना निर्माण करण्यास प्रेरित करणे.

(iii) राष्ट्रीय गोकुळ अभियान (RGM) अंतर्गत १००% कृत्रिम बुद्धिमत्ता कव्हरेज घेण्यासाठी कृत्रिम रेतन तंत्रज्ञांना प्रेरित करणे.

**पात्रता:**

(i) ५३ जातीच्या गायी आणि २० जातीच्या म्हशींपैकी मान्यताप्राप्त देशी जातींपैकी कोणत्याही जातीचे पालन करणारे शेतकरी पुरस्कारासाठी अर्ज करण्यास पात्र असतील.

(ii) शेतकऱ्यांकडून थेट दूध संकलन / गाव पातळीवर संकलन करण्यासाठी स्थापन केलेली दुग्ध सहकारी संस्था / दूध उत्पादक कंपनी (MPC चे दूध संकलन केंद्र) / शेतकरी उत्पादक संघटना (FPO) ते सहकारी संस्था कायदा / कंपन्या कायद्याअंतर्गत नोंदणीकृत असले पाहिजे आणि दररोज किमान १०० लिटर दूध संकलन क्षमता असावी.

(iii) राज्य / केंद्रशासित पशुधन विकास मंडळे / राज्य / दूध संघ / एनजीओ आणि इतर खाजगी संस्थांचे कृत्रिम रेतन तंत्रज्ञ ज्यांनी किमान ९० दिवसांचे कृत्रिम रेतन प्रशिक्षण घेतले आहे, ते या पुरस्कारासाठी अर्ज करण्यास पात्र असतील. हा पुरस्कार कृत्रिम रेतन तंत्रज्ञ (AIT) साठी असल्याने, पशुवैद्य या पुरस्कारासाठी पात्र नाहीत.

**(अर्ज भरण्याची पद्धती... पुढील पानावर...)**

**फॉर्म भरण्याची प्रक्रिया:**

गृह मंत्रालयाच्या (एमएचए) https://awards.gov.in या ऑनलाइन पुरस्कार पोर्टलद्वारे कोणत्याही व्यक्ती किंवा संस्थेस स्व-नामांकनाच्या आधारावर ऑनलाइन नामांकन करता येईल. हे नामांकन वैयक्तिकरित्या किंवा सामान्य सेवा केंद्रांच्या (सीएससी) मदतीने केले जाऊ शकते. **https://awards.gov.in** या संकेतस्थळावर ऑनलाइन अर्ज भरण्यात कोणताही संसाधन व्यक्ती शेतकऱ्यांना मदत करू शकतो. पर्यायीरित्या, सहकारी संस्था, शेतकरी उत्पादक कंपन्या, पशुवैद्यकीय अधिकारी या पोर्टलद्वारे वैयक्तिक शेतकरी किंवा कृत्रिम गर्भाधान करणाऱ्यांना फॉर्म भरण्यात आणि सबमिट करण्यात मदत करू शकतात. प्रत्यक्ष सादर केलेला कोणताही अर्ज विचारात घेतला जाणार नाही. केवळ ऑनलाईन पद्धतीने सादर केलेला अर्जच स्विकारला जाईल.

**(i)** एनआयसी, डीएएचडी त्यांच्या वेबसाइटवर पुरस्कार वेबसाइटची लिंक प्रदान करेल.

**(ii)** अर्जदार प्रत्येक श्रेणीसाठी फक्त एकच अर्ज भरू शकतो.

**(iii)** वैयक्तिक दुग्ध उत्पादक (वर्ग I) आणि वैयक्तिक कृत्रिम रेतन कामगार (वर्ग II) यांच्या बाबतीत, अर्जदाराने त्यांचे छायाचित्र अपलोड करावे. दुग्ध सहकारी संस्था (वर्ग III) यांच्या बाबतीत, सचिव/अध्यक्षांचे छायाचित्र अपलोड करावे.

**(iv)** सहकारी संस्थेची माहिती अपलोड करणे अनिवार्य आहे. अपूर्ण आढळल्यास अर्ज नाकारला जाईल.

**(v)** प्रत्यक्ष अर्ज स्वीकारले जाणार नाही.

**(vi)** वैयक्तिक श्रेणीच्या बाबतीत आधार अनिवार्य आहे.

**(vii)** पोचपावतीची किंवा ऑनलाइन सबमिट केलेल्या अर्जाची हार्ड कॉपी पाठविण्याची आवश्यकता नाही.

**(viii)** सहकारी संस्थांच्या श्रेणीमध्ये, संस्थेचा नोंदणी क्रमांक, नाव आणि पत्ता स्पष्टपणे दर्शविणारे संबंधित नोंदणी प्रमाणपत्राच्या प्रती, संस्थेच्या सचिवांनी स्वतः साक्षांकित केलेले, सहकारी संस्थेच्या नावाने पॅन कार्ड आणि बँक पासबुकची प्रत ज्यामध्ये खाते क्रमांक, IFSC कोड, CIF क्रमांक, सहकारी संस्थेचे नाव आणि पत्ता समाविष्ट आहे, ते देखील अपलोड केले जाऊ शकतात.

**(ix)** ज्या व्यक्ती/संस्थेला मागील वर्षांत गोपाळ रत्न आणि पूर्वीचा कामधेनू पुरस्कार मिळाला आहे ते गोपाळ रत्न पुरस्कार २०२५ साठी पात्र नाही.

**पुरस्कारांसाठी सामान्य संदर्भ**

(i) पुरस्कार विजेत्यांना प्रवास भत्ता / दैनिक भत्ता (TA/DA) द्वितीय श्रेणी एसी रेल्वे भाड्यापर्यंत मर्यादीत रक्कम अनुज्ञेय असेल. सहकारी संस्था/दूध उत्पादक कंपन्यांच्या बाबतीत, सचिवांसह सहकारी/MPC च्या फक्त दोन व्यक्तींना प्रवास भत्ता / दैनिक भत्ता वितरण करण्यासाठी विचारात घेतले जाईल.

(ii) सहकारी संस्था/एमपीसींच्या बाबतीत, पुरस्काराची रक्कम सहकारी/एमपीसी बँक खात्याच्या नावे काढली जाईल.

**अंदाजे वेळापत्रक**

| अ. क्र. | अंदाजे तारखा | कार्यक्रम |
|---|---|---|
| १ | १५ ऑगस्ट २०२५ | ऑनलाइन अर्ज सादर करण्याची सुरुवात |
| २ | १५ सप्टेंबर २०२५ | अर्जदारांनी पुरस्कारासाठी अर्ज सादर करण्याची अंतिम तारीख. |
| ३ | १-१५ ऑक्टोबर २०२५ | क्यूसीआय किंवा इतर कोणत्याही पॅनेल केलेल्या एजन्सीद्वारे सामान्य श्रेणीतील (नॉन-एनईआर राज्ये) सर्वोत्तम २० अर्ज आणि प्रत्येक श्रेणीतील एनईआर आणि हिमालयीन राज्यांमधून १० अर्जांची प्राथमिक तपासणी आणि शिफारस. |
| ४ | १६-३१ ऑक्टोबर २०२५ | एनडीडीबी/इतर कोणत्याही पॅनेल केलेल्या एजन्सीद्वारे क्षेत्र भेट/पडताळणी. |
| ५ | १-१० नोव्हेंबर २०२५ | क्यूसीआय किंवा इतर कोणत्याही पॅनेल केलेल्या एजन्सीद्वारे क्षेत्र पडताळणी अहवालावर आधारित अर्जांचे पुनर्मूल्यांकन. |
| ६ | १२ नोव्हेंबर २०२५ | पुरस्कार छाननी समितीची शिफारस. |
| ७ | १९ नोव्हेंबर २०२५ | राष्ट्रीय पुरस्कार समितीची बैठक आणि पुरस्कार विजेत्यांच्या नावांना अंतिम स्वरूप देणे. |
| ८ | २५ नोव्हेंबर २०२५ | मत्स्यव्यवसाय, पशुसंवर्धन आणि दुग्धव्यवसाय मंत्री यांच्याकडून गोपालरत्न पुरस्कार विजेत्यांच्या नावांची घोषणा. |
| ९ | २६ नोव्हेंबर २०२५ | गोपालरत्न पुरस्कार माननीय पंतप्रधान/माननीय मत्स्यव्यवसाय, पशुसंवर्धन आणि दुग्धव्यवसाय मंत्री यांच्याकडून प्रदान केला जाईल. |

भाकृअनुप - राष्ट्रीय पशु आनुवंशिक संसाधन ब्युरो
ICAR- National Bureau of Animal Genetic Resources (NBAGR) ISO 9001:2015 - Certified Organization



# पशुप्रजाती संवर्धन पुरस्कार-२०२५



(डॉ. शितलकुमार मुकणे)
अतिरिक्त आयुक्त पशुसंवर्धन तथा व्यवस्थापकीय संचालक,
पुण्यश्लोक अहिल्यादेवी महाराष्ट्र मेंढी व शेळी विकास महामंडळ,
महाराष्ट्र राज्य, पुणे - ४११०६७

आयसीएआर-नॅशनल ब्युरो ऑफ ॲनिमल जेनेटिक रिसोर्सेस (आयसीएआर-एनबीएजीआर), करनाल, हरियाणा ही पशुसंवर्धनातील एक अग्रणी व आघाडीची संस्था आहे. या संस्थेचे कार्य देशातील पशुधन आणि कुक्कुटपालन संपत्तीची ओळख, मूल्यांकन, वैशिष्ट्यीकरण, संवर्धन आणि अंमलबजावणी व धोरणात्मक मुद्द्यांवर समन्वय साधून त्यांच्या शाश्वत वापरासाठी पशु अनुवांशिक संपत्तीचे व्यवस्थापन करणे हे आहे.

राष्ट्रीय पशु अनुवांशिक संसाधन ब्युरो, करनाल नोंदणीकृत पशु आणि कुक्कुट जातींचे संवर्धन व देखभाल करण्यात गुंतलेल्या पशुपालक, व्यक्ती, समुदाय आणि संस्थांना पशु प्रजाती संवर्धन पुरस्कारासाठी अर्ज करण्यासाठी आमंत्रित करते. या वर्षी, पशु प्रजाती संवर्धन पुरस्कार वैयक्तिक व संस्थात्मक अशा दोन श्रेणींमध्ये दिला जाणार आहे. प्रत्येक श्रेणीमध्ये प्रथम, द्वितीय व तृतीय याप्रमाणे पुरस्कार प्रदान केले जातील. तसेच प्रत्येक श्रेणीमध्ये एक प्रोत्साहनपर पुरस्कार प्रदान करण्यात येईल. हा पुरस्कार नॅशनल ब्युरो ऑफ ॲनिमल जेनेटिक रिसोर्सेसद्वारे (ICAR) २३ डिसेंबर २०२५ रोजी किसान दिनानिमित्त दिला जाईल.

या पुरस्कारासाठी अर्ज सादर करण्याची शेवटची तारीख ३१ ऑक्टोबर २०२५ आहे. विहित नमुन्यातील (पशुधनाच्या रंगीत छायाचित्रांसह) पूर्णपणे भरलेले अर्ज दि. ३१ ऑक्टोबर २०२५ रोजी किंवा त्यापूर्वी संचालक, आयसीएआर-एनबीएजीआर, करनाल यांच्या कार्यालयात पोहोचतील अशा बेताने अग्रेषित करण्यात यावेत.

### पुरस्कार्थीची निवड पद्धत

ICAR-NBAGR, करनाल यांना ब्रीड कंझर्वेशन अवॉर्डसाठी प्राप्त झालेल्या सर्व अर्जांची (सर्व बाबतीत परिपूर्ण अर्ज) पात्रतेसाठी छाननी केली जाईल आणि एक तज्ञ निवड समिती स्थापन केली जाईल. या तज्ञ समितीने केलेल्या शिफारशींनुसार पुरस्कार विजेत्यांची निवड केली जाईल. कमी संख्येने किंवा धोक्यात असलेल्या पशु प्रजातींच्या संवर्धनात सहभागी असलेल्या कृत्रिम रेतन सेवादात्यांना, व्यक्तींना, समुदायांना आणि संस्थांना प्राधान्य दिले जाईल. सर्व ब्रीड कंझर्वेशन अवॉर्ड विजेत्यांची नावे ICAR NBAGR, करनालच्या वेबसाइटवर (https://nbagr.res.in/) जाहीर केली जातील आणि अर्जदारांना ई-मेल/फोनद्वारे देखील कळवले जाईल.

### अर्जासाठी पात्रता आणि निकष

१) स्थानिक नोंदणीकृत पशु प्रजातींचे संवर्धन आणि देखभाल किंवा संरक्षित जातींच्या उत्पादनांपासून निर्मित उपउत्पादन /

त्यांना मूल्य जोडणे, पशु प्रजातींचे महत्त्व वाढवणे, पशुप्रजाती संवर्धनासाठी प्राणी प्रजनन सेवा देणे यामध्ये गुंतलेले भारतीय नागरिक, व्यक्ती, समुदाय आणि संस्था व वरीलपैकी कोणत्याही उपक्रमाद्वारे प्रजाती संवर्धनात गुंतलेले व्यक्ती, प्राणी रक्षक, समुदाय / संस्था किंवा संवर्धनवादी अर्ज करू शकतात.

२) कोणतीही व्यक्ती, समुदाय किंवा संस्था जी गेल्या पाच वर्षांपासून (पुरस्कार वर्षाच्या आधी) प्राणी संरक्षण आणि पशुसंवर्धन क्षेत्रात सक्रियपणे कार्यरत आहे, ती पशुप्रजाती संवर्धन पुरस्कारासाठी अर्ज करू शकते.

३) नोंदणीकृत पाळीव पशुधनाच्या संवर्धन कामात गुंतलेली कोणतीही संस्था, नोंदणीकृत ब्रीडर असोसिएशन, प्रजातीवर आधारित संस्था, इतर संस्था, स्वयंसेवी संस्था किंवा गौशाळा इत्यादी, संस्थात्मक श्रेणी अंतर्गत विचारात घेतल्या जातील.

४) कोणतीही व्यक्ती/समुदाय/संस्था एकापेक्षा जास्त प्रजातींसाठी अर्ज करू शकते, परंतु प्रत्येक अर्ज फक्त एकाच पशुधन / कुक्कुट प्रजातीसाठी वैध असेल. जर अर्जात एकापेक्षा जास्त प्रजातींचा उल्लेख असेल तर तो अर्ज नाकारला जाईल. म्हणून, अर्जदारांनी प्रत्येक जातीसाठी स्वतंत्र अर्ज सादर करावेत आणि एका अर्जात फक्त एकाच जातीचा उल्लेख करावा.

५) या पुरस्कारासाठी फक्त आयसीएआर-एनबीएजीआर, करनाल येथे नोंदणीकृत पशुधन आणि कुक्कुट जातींचा विचार केला जाईल. नोंदणीकृत जातींची यादी https://nbagr.res.in/ वर दिली आहे.

६) अर्जदाराकडे कमीत कमी खालील संख्यातील पशु /कुक्कुट पाळलेली असणे आवश्यक आहे.

७) गेल्या तीन वर्षात (२०२२-२०२४) कोणत्याही श्रेणीत (वैयक्तिक/संस्थात्मक) पुरस्कार मिळालेल्या जाती पुन्हा **त्याच श्रेणीत** पुरस्कारासाठी पात्र राहणार नाहीत. तथापि, जर एखाद्या जातीला वैयक्तिक श्रेणीत पुरस्कार मिळाला असेल, तर ती संस्थात्मक श्रेणीत पात्र असेल आणि जर एखाद्या जातीला संस्थात्मक श्रेणीत पुरस्कार मिळाला असेल, तर ती वैयक्तिक श्रेणीत पात्र असेल. (तपशीलवार यादीसाठी https://nbagr.res.in/ वर उपलब्ध मार्गदर्शक माहितीपत्रकाच्या कृपया शेवटच्या पानावरील परिशिष्ट-१ पहा.)

## आवश्यक सूचना:

१. अर्जासाठी कोणतेही शुल्क नाही, परंतु अर्जाच्या दोन प्रती सादर कराव्या लागतील.
२. अर्जासोबत मागील ३ वर्षांचे ऑडिट स्टेटमेंट जोडणे अनिवार्य आहे (हे फक्त बिगर-सरकारी संस्थांसाठी लागू आहे).
३. अर्जासोबत वैध नोंदणी प्रमाणपत्राची प्रत जोडणे अनिवार्य आहे (हे फक्त बिगर-सरकारी संस्थांसाठी लागू आहे).
४. हिंदी व इंग्रजी दोन्ही भाषेत नवीनतम अर्ज स्वरूप (MS-WORD / PDF स्वरूप), इतर संबंधित कागदपत्रे / घोषणा / तपशीलांसह फक्त ICAR-NBAGR वेबसाइट (https://nbagr.res.in/) वरून डाउनलोड करता येईल.
५. पुरस्कारासाठी अर्ज सीलबंद पाकिटात पाठवावा. संचालक, आयसीएआर-नॅशनल ब्युरो ऑफ ॲनिमल जेनेटिक रिसोर्सेस, जीटी रोड बायपास, करनाल - १३२००१ (हरियाणा) यांच्या पत्त्यावर अर्ज पाठवावा.
६. ऑनलाइन अर्ज / अर्जाची सॉफ्ट कॉपीदेखील स्वीकारली जाईल. परंतु, ऑनलाइन अर्ज करताना jpg स्वरूपात स्वतंत्र

| पशु प्रजाती वर्ग | व्यक्तिगत श्रेणी | संस्था श्रेणी |
|---|---|---|
| मोठी जनावरे: गाय, म्हैस, याक, मिथुन | १५ | १०० |
| मेंढी, शेळी व वराह | ५० | १०० |
| उंट, घोडा, गाढव इ. | १० | ३० |
| पाळीव कुक्कुट (कोंबडी, बदक, गूज (Goose)) | ३० | ३०० |




- फाइल्समध्ये फोटो आवश्यक आहेत. ई-मेलद्वारे पाठवताना, कृपया विषय ओळीत नमूद करा: " पशु प्रजाती संवर्धन पुरस्कारासाठी अर्ज - २०२५".

७. पुरस्कारासाठी फक्त नोंदणीकृत पशुधन व कुक्कुट जातींचा विचार केला जाईल. नोंदणीकृत जातींची यादी परिशिष्ट-II मध्ये दिली आहे. सविस्तर माहितीसाठी, कृपया ICAR-NBAGR वेबसाइट (https://nbagr.res.in/) वर उपलब्ध असलेली यादी पहा. अर्ज पाठवण्यापूर्वी कृपया संबंधित जातीचे नाव तपासा.




८. शेवटच्या तारखेनंतर प्राप्त झालेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत. कृपया अर्ज वेळेवर पाठवा. पोस्टल विलंबासाठी आयसीएआर-नॅशनल ब्युरो ऑफ ॲनिमल जेनेटिक रिसोर्सेस जबाबदार राहणार नाही.

९. पुरस्कारासाठी कोणत्याही स्वरूपात गैरप्रचार / प्रकार करण्यास परवानगी नाही. असे करताना आढळल्यास, संबंधिताचा अर्ज अपात्र ठरवला जाईल.

१०. या संदर्भात सर्व पत्रव्यवहार संचालक, आयसीएआर राष्ट्रीय प्राणी अनुवांशिक संसाधने ब्युरो, करनाल १३२ ००१ (हरियाणा) यांना उद्देशून करावा.

११. सर्व शंका संचालक, आयसीएआर-एनबीएजीआर, करनाल १३२००१ (हरियाणा) यांना विचारता येतील.

१२. पुरस्कार अर्जात प्रदान केलेल्या छायाचित्रांवर आणि इतर साहित्यावर आयसीएआर-नॅशनल ब्युरो ऑफ ॲनिमल जेनेटिक रिसोर्सेसचा अधिकार असेल.

१३.अर्जात काही तफावत आढळल्यास, संचालक, आयसीएआर-नॅशनल ब्युरो ऑफ ॲनिमल जेनेटिक रिसोर्सेस, करनाल यांचा निर्णय अंतिम आणि सर्वांना बंधनकारक असेल.

१४. अर्ज फॉर्म, अटी आणि शर्तींमध्ये भाषेतील तफावत असल्यास, इंग्रजी आवृत्ती ग्राह्य धरली जाईल. अर्ज फॉर्म / मार्गदर्शक तत्त्वे इत्यादींच्या भाषेच्या युक्तिवादात, इंग्रजी आवृत्ती अंतिम असेल.

**शंका समाधानासाठी कृपया खालील ठिकाणी संपर्क साधावा:**

- **डॉ. राजा के एन**
  प्रमुख शास्त्रज्ञ आणि कार्यक्रम समन्वयक,
  आयसीएआर-नॅशनल ब्युरो ऑफ ॲनिमल जेनेटिक रिसोर्सेस, करनाल १३२ ००१ (हरियाणा)
  फोन: ९४१६०८७७८५;
  ई-मेल: drknraja@gmail.com; -kn.raja@icar.org.in
- **संचालक,**
  आयसीएआर-नॅशनल ब्युरो ऑफ ॲनिमल जेनेटिक रिसोर्सेस, करनाल १३२ ००१ (हरियाणा)
  ई-मेल: directornbagr@gmail.com
  directornbagr2021@gmail.com

# पशुसंवर्धन विभागामार्फत WhatsApp चॅनेल सुरू

## पशुसंवर्धन विषयक सेवा व कार्याची मिळणार माहिती




पशुपालक व शेतकरी बांधवांना पशुसंवर्धन विषयक सेवा व कार्य याविषयीची माहिती विनासायास उपलब्ध व्हावी, तसेच त्यांना विभागाच्या योजना व उपक्रमांबाबत तात्काळ अवगत व्हावे, यासाठी मा. आयुक्त पशुसंवर्धन यांच्या निर्देशानुसार पशुसंवर्धन आयुक्तालयामार्फत व्हॉटस ग्रुपची स्थापना करण्यात आली आहे.

ग्रामीण महाराष्ट्राच्या विकासात भरीव योगदान देणाऱ्या पशुसंवर्धन विभागामार्फत विविध योजना व उपक्रम राज्यभर राबविण्यात येत असतात. पशुपालकांना याबाबत माहिती दिल्यास त्यांना संबंधित योजना व उपक्रमांचा लाभ घेणे शक्य होते. यासाठी प्रभावी प्रचार व प्रसिद्धीची गरज लक्षात घेता सोशल मिडियाचा समायोचित वापर करण्याचा प्रयत्न पशुसंवर्धन विभाग करीत आहे. या प्रयत्नांचाच एक भाग म्हणून व्हॉट्स अप चॅनेल पशुपालक व शेतकरी बांधवांसाठी स्थापित करण्यात आले आहे. या चॅनेलच्या माध्यमातून पशुसंवर्धनविषयक शासन निर्णय, ध्येय धोरणे, नवीन योजना, उपक्रम, कार्यमोहिमा, साथरोग लसीकरण व निर्मुलन, विभागांतर्गत घडामोडींचा संक्षिप्त परामर्श आदी माहिती पशुपालकांना उपलब्ध होणार आहे.

सदर व्हॉट्स अप चॅनेलला जोडून घेण्यासाठी शेतकरी / पशुपालक बांधवांनी खालील लिंकचा वापर करावा, असे आवाहन पशुसंवर्धन आयुक्तालयामार्फत करण्यात आले आहे. https://whatsapp.com/channel/0029Vb6Y3ErJf05aHJY3V30w

**"पशुसंवर्धन विभाग, महाराष्ट्र राज्य"** या नावाने एक नवीन WhatsApp चॅनेल सुरू करण्यात आला आहे. हा चॅनेल राज्यभरातील पशुपालक शेतकऱ्यांपर्यंत महत्त्वाच्या सूचना, घोषणा आणि माहिती पोहोचवण्यासाठी तयार करण्यात आला आहे.

या चॅनेलद्वारे शेतकऱ्यांना विविध योजनांची माहिती मिळेल आणि त्यांच्याशी थेट संवाद साधता येईल, त्यामुळे शेतकऱ्यांचा या चॅनेलशी सक्रिय सहभाग अत्यंत महत्त्वाचा आहे. जास्तीत जास्त शेतकरी व पशुपालकांनी या WhatsApp चॅनेलमध्ये सहभागी व्हावे असे आवाहन मा. आयुक्त पशुसंवर्धन डॉ. प्रवीणकुमार देवरे यांनी केले आहे.



### 'महापशुधन वार्ता' चे पशुपालकांकडून स्वागत

पशुसंवर्धन विभागाने मे-२०२५ पासून 'महापशुधन वार्ता' या डिजीटल ई-मासिकाचे प्रकाशन करण्यास सुरुवात केली आहे. पशुसंवर्धन विभागाच्या dahd.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर सदर मासिकाचे सर्व अंक वाचकांसाठी उपलब्ध करुन देण्यात आले आहेत. विभागातील घटना व घडामोडी, केंद्र व राज्य सरकारचे उपक्रम, कार्यमोहिमा, तांत्रिक लेख, यशोगाथा आदी विविध विषयांना स्पर्श करणाऱ्या या मासिकाला वाचकांकडून उत्तम प्रतिसाद मिळत आहे. दरमहा नियमितपणे प्रकाशित होणाऱ्या या मासिकाचे अंक आता पशुसंवर्धन विभागाने सुरु केलेल्या व्हॉटस्अप ग्रुपद्वारेही वाचकांना उपलब्ध होणार आहे.




ममत्वाची परिभाषा मानवामध्येच नाही, तर पशुपक्ष्यांमध्येही समृद्ध व सुबोध असते. परसातील या लक्ष्मीच्या पखाली मायेचा उबारा अन चोचीत क्षुधाशांती करणारा चारा आहे, जो चिवचिवणाऱ्या बाळबोधी कुक्कुटांसाठी जगण्याचा शाश्वत आधार आहे. पशुधनाची ऋचा हेच आपले कर्म व धर्म मानणारा संवेदनशील पशुवैद्यक अशा नाजूक नात्यांना अंतर्मनाच्या गाभाऱ्यात साठवून ठेवत असतो. वेगाने बदलणाऱ्या या जगात आपल्या अवतीभोवती नाविण्यता शोधत, अशा दुर्मिळ क्षणांना कॅमेऱ्यात टिपण्याचे प्रसंगावधान दाखवले आहे
**डॉ. प्रशांत भड (उपआयुक्त पशुसंवर्धन, पशुधन व कुक्कुट तथा सदस्य सचिव महाराष्ट्र गोजातीय प्रजनन नियमन प्राधिकरण)** यांनी.

# बैल पोळ्यानिमित्त सेल्फी विथ सर्जा-राजा

## २७० पशुपालकांचा सहभाग, वालूर पशुवैद्यकीय दवाखान्याचा उपक्रम

**वालूर, ता. सेलू, जि. परभणी**

बैलपोळा सणानिमित्त बैलाबाबत कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी व पशुपालकांना प्रोत्साहन देण्यासाठी सेलू तालुक्यातील वालूर येथील पशुवैद्यकीय दवाखाना श्रेणी-१ तर्फे 'सेल्फी विथ सर्जा-राजा' हा नाविन्यपूर्ण उपक्रम राबविण्यात आला. या उपक्रमाला प्रतिसाद देत पशुपालकांनी सहभाग नोंदविला. या उपक्रमात २७० पशुपालकांनी आपल्या छान सजावट केलेल्या बैलजोडीचे सेल्फी फोटो पशुवैद्यकीय दवाखान्याकडे पाठविले. यात एल. आर. फार्मास्युटिकल्सतर्फे सात बैल जोड्यांना लम्पी प्रतिबंधात्मक किट व क्षार मिश्रणाचे वाटप करण्यात आले. तसेच सहभागी प्रत्येक पशुपालकास प्रोत्साहनपर बक्षीस म्हणून जंत निर्मूलन, गोचीड गोमाशा निर्मूलनाचे औषध व अँटिसेप्टिक क्रीम देऊन सन्मानित करण्यात आले. प्रथम क्रमांक वालूरचे अनिल बोडखे यांनी, तर व्दितीय क्रमांक नागेश आंधळे यांनी पटकावला. तृतीय क्रमांक चंद्रकांत बिचकुले (बोरगाव) यांनी पटकावला. तसेच राजेश साडेगावकर, जनार्दन ताठे, युवराज कडे, श्याम दत्तात्रय मचाले, मुंजा भोगावकर आदी विजेते पशुपालक शेतकरी ठरले. याप्रसंगी सरपंच संजय साडेगावकर, श्याम मचाले, मिलिंद आठवले, डॉ. दीपक धर्माधिकारी आदींची उपस्थिती होती. लक्ष्मण खंडागळे, अप्पासाहेब माने, सुभाष दशरथे, किरण शिंदे, संतोष भालेराव यांच्यासह बोर्डीकर कृषी महाविद्यालय, सेलू येथील धनराज गायके, सुधाकर सोनेकर, गौरव तौर, डॉ. दीपक देसाई यांनी उपक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रयत्न केले.



सेल्फी विथ सर्जा-राजा विजेता अनिल बोडखे यांची बैलजोडी.







# बैलाला सर्पदंश: उपचारासाठी धावले 'आरोग्य' व 'पशुसंवर्धन'

**जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त कार्यालय, नागपूर द्वारा**

कुणा एका सजीवाचे पाच मिनिटानंतरचे भविष्य सांगणारे कुठलेच यंत्र, तंत्र वा शास्त्र अस्तित्वात नाही. त्यामुळे आपत्कालीन परिस्थिती कधी निर्माण होईल, हे सांगणे कठीण आहे. असाच एक अनुभव नागपुर जिल्ह्यातील कुही तालुक्यातील तारणी येथील सर्वसामान्य शेतकरी व पशुपालक श्री. वी. ए. बागडे यांना आला. त्यांच्या दोन बैलांपैकी एका बैलास विषारी वायपर जातीचा साप चावला. त्यामुळे बैलाचा समोरचा डावा पाय खूप सुजला होता.

सदर घटनेची गंभीरता ओळखताच वी. ए. बागडे यांनी तात्काळ तितूर येथील पशुवैद्यकीय दवाखान्यात संपर्क साधला. तितूरमध्ये पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. हर्षल रेवतकर आणि पशुधन पर्यवेक्षक श्री. सारंग राऊत कार्यरत आहेत. पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांनी बैलास वेळीच प्रथमोपचार देत आवश्यक तपासण्या केल्या. परंतु, काही वेळातच त्यांच्या लक्षात आले की बैलाच्या जीवाला धोका असून, त्याचे प्राण वाचवण्यासाठी 'एंटी-स्नेक व्हिनोम' देणे आवश्यक आहे. मात्र, तालुक्यातील इतर खाजगी पशुवैद्यकीय औषध विक्री दुकानांमध्ये सदरचे औषध उपलब्ध होऊ शकले नाही. अखेर जवळच्याच प्रायमरी हेल्थ सेंटरमध्ये चौकशी केल्यावर औषध उपलब्ध असल्याचे समजले. मात्र, मागणी केल्यावर संबंधित अधिकाऱ्यांनी त्यांच्याकडे असलेल्या औषधी माणसांसाठी असून काही समस्या आली तर सरळ आमच्यावर येईल असे सांगितले. बैलाची प्रकृती क्षणाक्षणाला बिघडत असल्याने बैलाचे मालक श्री. बागडे यांनी सदरची माहिती थेट पालकमंत्र्यांपर्यंत पोहोचवली. डॉ. अविरत सवाईमुल, पशुधन विकास अधिकारी (विस्तार), पंचायत समिती कुही यांनीही एंटी स्नेक व्हिनोमसाठी यादरम्यान प्रयत्न केले. त्यानुसार संबंधित स्थानिक PHC (Public Health Centre) कडून एंटी-स्नेक व्हिनोम उपलब्ध करून दिले गेले.

पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांच्या सतर्कतेमुळे औषध त्वरित बैलाला दिले गेले. त्यासोबतच इतर आवश्यक उपचारही करण्यात आले. वेळेवर आणि योग्य उपचार केले गेल्यामुळे बैलाची प्रकृती झपाट्याने सुधारली आणि काहीच दिवसांत तो पूर्णपणे बरा झाला. ही संपूर्ण यशोगाथा ग्रामीण भागातील पशुवैद्यकीय यंत्रणा, सरकारी प्रतिसादक्षमता आणि एक संवेदनशील पशुपालक यांच्या एकत्रित प्रयत्नांचे प्रतीक आहे. अशा प्रकारच्या तत्पर कृतीमुळे मुक्या जीवाचे प्राण वाचवले गेले आणि एक उदाहरण समाजापुढे ठेवले गेले. या संपूर्ण प्रक्रियेत जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त डॉ. नितीन फुके यांचे मार्गदर्शन मोलाचे ठरले व क्षेत्रीय स्तरावर अशा स्वरुपाच्या आपत्कालीन परिस्थितीचा सामान करणे शक्य झाल्याचे डॉ. हर्षल रेवतकर यांनी सांगितले.



सर्पदंशामुळे मृत्युच्या दाढेत अडकलेल्या याच बैलावर पशुवैद्यकांनी आरोग्य विभागाच्या उचित सहकार्याने योग्य उपचार करत सदर बैलाचे प्राण वाचवले.

> पशुधनास सर्पदंश झाल्यास व त्यात चावणारा सर्प विषारी असेल तर पशुधनावर उपचार करताना एंटी-स्नेक व्हिनोम आवश्यक असते. सर्पदंशाच्या घटना अपवादाने घडत असतात. त्यामुळे एंटी-स्नेक व्हिनोम सहजतेने उपलब्ध होईलच असे नसते. तारणी येथील केसमध्ये आरोग्य विभागाच्या अधिकाऱ्यांनी केलेल्या सहकार्यामुळे सर्पदंश झालेल्या बैलावर वेळेत उपचार करणे शक्य झाले व बैलाचे प्राण वाचले.
>
> **डॉ. हर्षल रेवतकर**
> पशुधन विकास अधिकारी, पशुवैद्यकीय दवाखाना, तितूर

# अन्ननलिकेत अडकलेल्या गळावर शस्त्रक्रिया यशस्वी
# कासवाला मिळाले जीवनदान

नांदेड जिल्ह्यात अर्धापूर तालुक्यातील श्री. मजहर अहमद यांच्या २० वर्षाच्या सामान्य प्रजातीच्या कासवाच्या अन्ननलिकेत मासा पकडणारा गळ अडकल्यामुळे इजा झाल्याचे निदान दि. ११ ऑगस्ट २०२५ रोजी झाले. मालकाने घरी हाताने गळ काढण्याचा प्रयत्न केला, पण हा प्रयत्न अपयशी ठरला. अन्ननलिकेला इजा होऊन जवळपास सहा ते सात तास उलटून गेले होते. अखेर मजहर अहमद यांनी सदर कासवाला पशुवैद्यकीय केंद्रात तपासणीसाठी दाखल केले. तेथे तपासणी केल्यानंतर अन्ननलिकेत गळ खोलवर अडकलेला हातास जाणवत होते. हाताळणी दरम्यान कासवाकडून मध्यम प्रतिसाद व मानेची मर्यादित हालचाल होत असल्याचे निदर्शनास आले. कासवाच्या तोंडातून गळाची दोरी दिसत होती. त्यानुसार क्ष-किरण तपासणी करता गळाचा दांडा अन्ननलिकेत व वक्र भाग अन्ननलिकेच्या स्नायूमध्ये गुंतल्याचे दिसून आले.





### उपचार व शस्त्रक्रिया व्यवस्थापन

केटामीन हायड्रोक्लोराईड (५%) १२० मिग्रॅ/कि. ग्रा. व झायलाझिन हायड्रोक्लोराईड (२%) १ मिग्रॅ/कि.ग्रा. चा स्नायूत इंजेक्शनद्वारे संयुक्त वापर करण्यात आला. स्नायूत इंजेक्शन देण्यासाठी पुढील पायाच्या स्नायूला प्राधान्य देण्यात आले. संपूर्ण भुल प्रक्रिये दरम्यान कासवाला भुल देण्यापासून ते पूर्ण शुद्धीवर येईपर्यंत सतत निरीक्षणाखाली ठेवण्यात आले.

### शस्त्रक्रियेची पद्धत

- प्राथमिक प्रयत्नः तोंडातून गळ मागे ढकलून पुढे ओढून काढण्याचा प्रयत्न करण्यात आला, परंतु गळ घट्ट अडकल्यामुळे व प्रक्रिये दरम्यान अन्ननलिका फाटण्याचा धोका असल्याने प्रयत्न थांबविण्यात आला.
- अंतिम शस्त्रक्रिया: बाह्य चाचपणी द्वारे गळाचे काटा व टोकाचे अचूक स्थान निश्चित केले.
- त्याठिकाणी छोटा, लांबट घेण्यात आला.
- काटा कातडी बाहेर दिसल्यानंतर गळाचे टोक चिमट्याने पकडून गळाच्या वक्रतेनुसार फिरवून बाहेर ओढण्यात आले.
- गळाचे वळण मोकळे झाल्यानंतर किंचित छेद वाढवून गळाचा दांडा व डोळा त्याच छेदातून बाहेर काढण्यात आला.
- गळ काढल्यानंतर अन्ननलिका व स्नायूंची तपासणी केली असता कमी प्रमाणात रक्तस्राव व जखम आढळून आली.
- छेद बंद करण्यासाठी टाक्याचा वापर करण्यात आला.

### शस्त्रक्रियेनंतरची काळजी

- जंतुसंसर्ग टाळण्यासाठी प्रतिजैविके देण्यात आली.
- वेदना कमी करण्यासाठी वेदनाशामक औषधे देण्यात आली.
- जखमेवर ताण येवू नये म्हणून पहिल्या ७२ तासांकरिता मऊ किंवा द्रव आहार देण्यात आला.

### शस्त्रक्रिये पश्चात काळजी

१) तात्काळ: काही तासांत भुलमधून कासव निर्विघ्न सामान्य स्थितीत परत आले व मानेची हालचाल सुधारली.

२) शस्त्रक्रिये पश्चात क्ष-किरण तपासणी दरम्यान उरलेले धातूचे तुकडे नसल्याचे आढळून आल्यामुळे दीर्घकालीन अनुमान चांगला असल्याबाबत शक्यता वर्तवण्यात आली.

# पशुसंवर्धन विभागामार्फत सरीसृप वर्गीय प्राण्यांसाठी स्वास्थतपासणी व पशुवैद्यकीय सेवा

जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त कार्यालय, सांगली द्वारा,

सांस्कृतिक विविधतेमुळे सांगली जिल्हा आपल्या अनोख्या परंपरा व उत्सवांच्या आयोजनातून नेहमीच चर्चेचा विषय ठरत असतो. नागपंचमीसाठी पूर्वी लाखभर लोक बत्तीस शिराळा येथे जमा होत. परंतु, सापांचे होणारे हाल पाहून येथील निसर्ग व वन्यजीवपेमींनी थेट मुंबई हायकोर्टात धाव घेतली. कोर्टाने वन्य जीव संरक्षण कायद्यानुसार २००२ मध्ये आदेश देऊन सापांना पकडणे, त्यांचा खेळ करणे तसेच मिरवणूक काढणे, प्रदर्शन करणे, त्यांच्या स्पर्धा भरवणे यांना बंदी केली. तसेच या आदेशाचे तंतोतंत पालन करण्याची जबाबदारी जिल्हा प्रशासन, जिल्हा कोर्ट, वन खाते आणि पोलिसांवर सोपविली. त्यामुळे काही वर्षांपासून बत्तीस शिराळ्यात नागांची केवळ प्रतिकात्मक मिरवणूक काढली जात होती.



चालू वर्षी दिनांक २८ जुलै २०२५ रोजी वन्यजीव (संरक्षण) अधिनियम १९७२ च्या विविध कलमांचे व उपनिरीक्षक (वन्यजीव) नवी दिल्ली यांनी घालून दिलेल्या अटी व शर्तीचे काटेकोरपणे पालन करून २१ व्यक्तींना शैक्षणिक कारणास्तव (**शास्त्रीय नाव** - *Naja Naja* **सामान्य नाव**- *Indian Cobra* ) नागसाप पकडण्यास परवानगी देण्यात आली होती. त्यानुसार, सदर नागांना पकडताना व पुन्हा त्यांच्या नैसर्गिक अधिवासात सोडेपर्यंत पशुसंवर्धन विभागामार्फत डॉ. अजयनाथ थोरे (जिल्हा उपायुक्त पशुसंवर्धन व दुग्ध व्यवसाय) सांगली यांच्या मार्गदर्शनाखाली डॉ.सतीशकुमार जाधव प. वि. अ. (विस्तार), पंचायत समिती शिराळा यांचे संनियंत्रणाखाली तालुक्यातील अधिकारी व कर्मचारी यांच्या पाच पथकांमार्फत स्वास्थतपासणी व पशुवैद्यकीय सेवा यशस्वीपणे पुरविण्यात आली.

पुणे-बेंगलोर महामार्गावर कोल्हापूरकडे जाताना, पेठ नाका (इस्लामपूर)पासून उजव्या बाजूला एक फाटा फुटतो. तेथून साधारण २० किलोमीटर अंतरावर बत्तीस शिराळा हे गाव वसलेले आहे. बत्तीस शिराळ्यापासून जवळच चांदोली अभयारण्य व चांदोली धरण असल्याने सांगली जिल्हातील हा एकमेव निसर्गसमृद्ध भाग म्हणून प्रसिद्ध आहे.

बत्तीस शिराळा हा भाग भौगोलिकच नाही, तर सांस्कृतिक विविधतेतही प्रसिद्ध आहे. पुर्वी नागपंचमीचा उत्सव शिराळ्यात मोठ्या प्रमाणात साजरा केला जायचा, तेव्हा नागपंचमीच्या एक महिना अगोदर, म्हणजे बेंदूर सणानंतर येथील नाग मंडळे नाग पकडण्याच्या मोहिमेला निघत. हातात लांब काठी आणि नागाला ठेवण्यासाठी मडके असा लवाजमा घेऊन ५-६ तरुणांचा ग्रुप मोहीम फत्ते करत असे. पकडलेल्या नाग व साप यांची योग्य प्रकारे काळजी नागपंचमीच्या सणापर्यंत घेतली जाई.

नागांना पकडताना व पुन्हा त्यांच्या नैसर्गिक अधिवासात सोडेपर्यंत पशुसंवर्धन विभागामार्फत तालुक्यातील अधिकारी व कर्मचारी यांचे पाच पथकामार्फत स्वास्थतपासणी व पशुवैद्यकीय सेवा यशस्वीपणे पुरविण्यात आली. पशुसंवर्धन विभागाच्या या सक्रीय सहभागाबाबत व लोकांमध्ये जनजागृती करण्याबाबत वनविभागामार्फत आभार व्यक्त करणेत आले.

**बत्तीस शिराळ्याची नागपंचमी प्रसिद्ध :** पुर्वी नागपंचमीच्या दिवशी शिराळा गावात ग्रामदेवतेची पूजा करून साधारणपणे १००-१२५ नागांची मिरवणूक काढली जाई. त्यानंतर नागाचे खेळ आयोजित होत. सर्वात उंच फणा काढणारा नाग, सर्वात लांब नाग अशी वर्गवारी करुन संबंधित मंडळांना बक्षिसे वितरीत करण्यात येत असत. यांतील आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे २ वर्षांच्या बालकापासून ते म्हाताऱ्या माणसांपर्यंत सर्वजण न घाबरता गळ्यात नाग / धामण घालून फोटो काढत असत. त्यामुळे शिराळ्याची नागपंचमी पूर्वी देशातच नव्हे तर परदेशांतही प्रसिद्ध होती.



# पंजाबमधील १०० महिला सरपंचांनी केली महाराष्ट्रातील एनएलएम प्रोजेक्टची पाहणी

केंद्रशासनाच्या पशुसंवर्धन आणि दुग्धव्यवसाय विभागामार्फत सन २०२१-२२ पासून राज्यात राष्ट्रीय पशुधन अभियानांतर्गत उद्योजकता विकास हा कार्यक्रम राबवण्यात येत आहे. या योजनेचा मुख्य उद्देश म्हणजे रोजगार निर्मिती करणे, उद्योजकता विकास करणे आणि पशुंची उत्पादकता वाढवणे, याबरोबरच या कार्यक्रमांतर्गत एका छताखाली मांस, बकरीचे दूध, लोकर, अंडी यांचे उत्पादन वाढवणे, वैरणीची उपलब्धता वाढवणे, पशुधनाच्या वंशावळीत सुधारणा करणे आणि नाविन्यपूर्ण उपक्रमास प्रोत्साहन देणे. असंघटित क्षेत्रातील उत्पादनांच्या विक्रीकरता आणि त्यांना चांगल्या दर्जाचा कच्चामाल उपलब्ध होण्याकरिता संघटित क्षेत्रांना जोडून उद्योजकता विकास साधणे, ही यामागची मुख्य संकल्पना आहे.

महाराष्ट्र राज्यात राष्ट्रीय पशुधन अभियानांतर्गत स्थापित करण्यात येणारे प्रकल्प आता इतर राज्यातील पशुपालकांसाठी मार्गदर्शक ठरू लागले आहेत. नांदेड जिल्ह्यातील मुदखेड तालुक्यात वरदडा तांडा येथील सुप्रिया अरविंद राठोड यांच्या शेळीपालन प्रकल्पाला नुकतीच पंजाब राज्यातील १०० महिला सरपंचांच्या टीमने भेट दिली. यावेळी सुप्रिया राठोड यांनी राष्ट्रीय पशुधन अभियानांतर्गत उभारलेल्या शेळी प्रकल्पाची माहिती उपस्थित महिला सरपंचांना दिली. पंजाबमधील महिला सरपंचांनी सुप्रिया राठोड यांच्या प्रकल्पाचे व पशुसंवर्धन विभागाने केलेल्या कामकाजाचे कौतुक केले. पंजाब राज्यातही आम्ही अशाच स्वरुपाचे प्रकल्प स्थापन करण्यासाठी शासनाकडे पाठपुरावा करु, अशी प्रतिक्रिया यावेळी पंजाबमधील महिला सरपंचांनी व्यक्त केली.






## कोल्हापुरात स्वच्छ-सुंदर गोठा अभियान




कोल्हापुरचे पालकमंत्री मा. ना. श्री. प्रकाश आबिटकर यांच्या संकल्पनेतून पशुसंवर्धन विभागाच्या वतीने आयोजित उत्कृष्ट पशुपालक, स्वच्छ व सुंदर गोठा अभियानाचा शुभारंभ व आदर्श गोठा पुरस्कार वितरण सोहळा शासकीय विश्रामगृहातील राजर्षी शाहू सभागृहात झाला. या स्पर्धेसाठी जिल्हास्तरावर अनुक्रमे ४१, ३१ व २१ हजारांचे, तर तालुकास्तरावर २१, १५ व १० हजारांचे बक्षीस देण्याची घोषणा आबिटकर यांनी केली.

यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी कार्तिकेयन एस. (भा.प्र.से.), अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संतोष जोशी, पशुसंवर्धन व दुग्ध व्यवसाय विभागाचे जिल्हा उपायुक्त डॉ. महेश शेजाळ, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अनिरुद्ध पिंपळे आदी उपस्थित होते. जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात दूध उत्पादन होत असून, हे उत्पादन स्वच्छ व दर्जेदार पद्धतीने होण्यासाठी आदर्श गोठा तयार होणे आवश्यक आहे. या अभियानाच्या धर्तीवर आता जिल्हा परिषदेच्या वतीने 'स्वच्छ सुंदर घर अभियान' राबवण्यात येणार आहे. यावेळी अनेक नावीन्यपूर्ण उपक्रम राबवल्याबद्दल मुख्य कार्यकारी अधिकारी कार्तिकेयन एस. यांच्या कामाचे पालकमंत्री मा. ना. प्रकाश आबिटकर यांनी कौतुक केले.




हिरापूर पशु बाजार आणि पशुवैद्यकीय क्लिनिक, हिरापूर ता. गेवराई जिल्हा बीड येथे फिलीपिन्स देशाच्या प्रतिनिधींनी भेट दिली. या भेटीचा मुख्य उद्देश औरंगाबाद येथील अल्लाना कत्तलखान्यातून फिलीपिन्सला करण्यात येणाऱ्या मांस निर्यातीचे विविध स्रोत व कत्तलखान्याची पाहणे करणे हा होता. यादरम्यान, प्रतिनिधींनी पशुवैद्यकीय दवाखाना, हिरापूर यांनी केलेली वैद्यकीय साहित्य खरेदी प्रणाली, एफएमडी लसीकरण वेळापत्रक पाहिले. एफएमडी लसीकरणाच्या एनडीएलएम नोंदींनंतर ते समाधानी झाले. टीमने ईडीआर रजिस्टरद्वारे एफएमडीचा प्रादुर्भाव नसल्याची पुष्टी केली. यावेळी इतर विविध पशुसंवर्धनविषयक उपक्रम, पशुवैद्यकीय सेवा, योजना इत्यादींबद्दल चर्चा करण्यात आली.




लोकनेते स्व. गोपीनाथराव मुंडे यांच्या पुर्णाकृती पुतळ्याचा भव्य अनावरण सोहळा मान्यवरांच्या उपस्थितीत मोठ्या उत्साहात पार पडला.

पशुसंवर्धन विभाग, लातूर यांनी या सोहळ्यात आकर्षक व ज्ञानवर्धक स्टॉल उभारला. येथे QR CODE Scanner च्या माध्यमातून पशुपालकांना विविध शासकीय योजना, आहार व्यवस्थापन, दुग्ध व्यवसाय, शेळीपालन तसेच विविध पशुरोग याविषयी उपयुक्त व अचूक माहिती उपलब्ध करुन देण्यात आली. पशुपालकांनी या उपक्रमाचे स्वागत केले.




# 'महापशुधन वार्ता' च्या चौथ्या अंकाचे प्रकाशन

**पशुसंवर्धन आयुक्तालय, औंध, पुणे-६७**

पशुसंवर्धन विभागामार्फत दरमहा प्रकाशित करण्यात येणाऱ्या 'महापशुधन वार्ता' या डिजीटल ई-मासिकाच्या चौथ्या अंकाचे प्रकाशन महाराष्ट्र गोसेवा आयोगाचे अध्यक्ष मा. श्री. शेखर मुंदडा व मा. आयुक्त पशुसंवर्धन डॉ. प्रवीणकुमार देवरे यांचे हस्ते करण्यात आले.

महाराष्ट्र गोसेवा आयोगाच्या मुख्यालयात आयोजित एका छोटेखानी कार्यक्रमात अतिरिक्त आयुक्त पशुसंवर्धन डॉ. शितलकुमार मुकणे, प्रादेशिक सहआयुक्त पशुसंवर्धन, पुणे विभाग डॉ. समीर बोरकर, सहआयुक्त पशुसंवर्धन तथा सदस्य सचिव, गोसेवा आयोग डॉ. मंजुषा पुंडलिक, गोसेवा आयोगाचे सदस्य मा. डॉ. नितीन मार्कंडेय, उपआयुक्त पशुसंवर्धन तथा संपादक 'महापशुधन वार्ता' या डिजीटल ई-मासिक डॉ. प्रशांत भड, जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त डॉ. अंकुश परिहार, उपआयुक्त पशुसंवर्धन (रोग अन्वेषण विभाग) डॉ. सुनील लहाने आदींच्या उपस्थितीत हा प्रकाशन सोहळा पार पडला.

'महापशुधन वार्ता' या डिजीटल ई-मासिकात समाविष्ट तांत्रिक लेखांचे, वृत्तांकनाचे व यशकथांचे श्री. शेखर मुंदडा यांनी अवलोकन करत अंकाच्या पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. पशुसंवर्धन विभागामार्फत आरंभण्यात आलेल्या या उपक्रमामुळे पशुपालक-शेतकरी बांधवांशी विभागाचा संवाद अधिक व्यापक व सुबोध होत असल्याचे गौरवोद्गार मा. आयुक्त पशुसंवर्धन डॉ. प्रवीणकुमार देवरे यांनी काढले.



## माध्यमांनी घेतलेली दखल

सकाळ

# बोरगाव–धडकनाळ परिसरात पूरस्थिती

## आपत्ती व्यवस्थापन यंत्रणा सतर्क; मदतकार्य सुरू

**उदगीर, ता. १८ (बातमीदार)** : तालुक्यातील धडकनाळ, बोरगाव परिसरात रविवारी (ता.१७) रात्रीपासून झालेल्या मुसळधार पावसामुळे पूरस्थिती निर्माण झाली असून अनेक गावांचा संपर्क तुटला आहे. मध्यरात्रीपासून उदगीर- देगलूर महामार्गावरून पाणी वाहत असल्याने हा मार्ग बंद करण्यात आला आहे.

रात्रभर कोसळलेल्या पावसामुळे हजारो हेक्टर क्षेत्रातील तूर, सोयाबीन, मका, ऊस यासह इतर पिकांचे मोठे नुकसान झाले आहे. काही ठिकाणी पिके वाहून गेल्याने शेतकऱ्यांपुढे उदरनिर्वाहाचा प्रश्न निर्माण झाला आहे. पाण्याच्या प्रचंड प्रवाहामुळे रस्त्याला तडे गेले असून पुलांवरून पाणी वाहू लागले आहे.

दरम्यान, बोरगाव परिसरातील तीन विद्युत रोहित्र व अनेक पोल जमीनदोस्त झाल्याने वीजपुरवठा खंडित झाला आहे. गावातील अनेक घरात, शाळा, अंगणवाड्यांमध्ये पाणी घुसल्याने नागरिक अडचणीत आले आहेत. आपत्ती व्यवस्थापन यंत्रणा सतर्क असून उपजिल्हाधिकारी सुशांत शिंदे, तहसीलदार बोरगावकर, गटविकास अधिकारी प्रवीण सुरडकर तसेच पोलिस निरीक्षक राजकुमार पुजारी यांच्या मार्गदर्शनाखाली मदतकार्य सुरू आहे.

लायन्स क्लब व रोटरी क्लबच्या सदस्यांनी गावकऱ्यांसाठी अन्नदान करून दिलासा दिला.



उदगीर : तालुक्यातील गावात पावसाचे साचलेले पाणी.

### लेंडी नदीला पूर, जनावरे दगावली

लातूर, ता. १८ : उदगीर तालुक्यातील बोरगाव व धडकनाळ परिसरात झालेल्या ढगफुटी सदृश पावसामुळे लेंडी नदीला अचानक पूर आला. या पुरात आठ मोठी जनावरे आणि सात शेळ्या दगावल्याची माहिती पशुपालकांनी दिली. प्रशासनाकडून हरवलेल्या जनावरांचा शोध सुरू असून सोमवारी (ता. १८) सकाळपर्यंतच्या पाहणीत मोठे नुकसान झाल्याचे स्पष्ट झाले. पशुसंवर्धन विभागाचे सहायक आयुक्त डॉ. कृष्णा पांडे व डॉ. विजय घोणशीकर यांच्या मार्गदर्शनाखाली सात शीघ्र कृतिदल घटनास्थळी दाखल होऊन उपचार, लसीकरण, पंचनामे व मृत जनावरांची शास्त्रोक्त विल्हेवाट या कामांना सुरुवात केली आहे. जि[...] उपायुक्त पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय [...] पशुधन विकास अधिकारी डॉ. सुले[...] उपविभागीय अधिकारी सुशांत शि[...] बोरगावकर, गटविकास अधिक[...] यांनीही प्रत्यक्ष पाहणी करून [...]

Aurangabad, Latur-Today
19/08/2025 Page No. 1

पुढारी



# धडकनाळ, बोरगावमध्ये पावसाचे तांडव

## चोहीकडे पाणीच पाणी, शेती, गुरे गेली वाहून

My Latur Edition
Aug 19, 2025 Page No. 01
Powered by: erelego.com

# पशुसंवर्धन सचिवांची हेटीकुंडी येथील गवळाऊ प्रक्षेत्रास भेट

देशोन्नती वृत्तसंकलन

वर्धा : राज्याचे पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय विकास विभागाचे सचिव डॉ. रामास्वामी एन यांनी कारंजा तालुक्यातील हेटीकुंडी येथील गवळाऊ प्रजनन प्रक्षेत्रास भेट देऊन पाहणी केली.

यावेळी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी पराग सोमण, महाराष्ट्र पशुधन विकास मंडळ नागपूरचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. मुकणे, प्रादेशिक सहआयुक्त पशुसंवर्धन डॉ. सतीश राजू, डॉ. बेदरकर उपस्थित होते. यावेळी डॉ. रामास्वामी व अन्य मान्यवरांनी गवळाऊ प्रजनन प्रक्षेत्राची पाहणी केली. हेटीकुंडी येथे शासनाने भ्रूण प्रत्यार्पण प्रयोगशाळेसाठी ६ कोटी रुपये मंजूर केले आहे. या निधीतून होत असलेल्या कामाची सचिव डॉ. रामास्वामी यांनी पाहणी करून आवश्यक सूचना दिल्या. तसेच गवळाऊ प्रक्षेत्राच्या कामकाजाची पाहणी करून प्रक्षेत्रावर सोलर बसवण्याच्या सूचना केल्या. या भेटीच्यावेळी जिल्हा उपायुक्त पशुसंवर्धन डॉ. जगदीश बुकतरे, फार्म अधीक्षक डॉ. भारत अस्वार, डॉ. वनकर, पशुसंवर्धनचे सहायक आयुक्त डॉ. बिडकर तसेच फार्मचे कर्मचारी प्रवीण गव्हाट आदी उपस्थित होते.



दिव्य मराठी

बुलडाणा 13-08-20

शहर

पुण्यनगरी ३

# पशुसंवर्धनचे ७ शीघ्र कृतीदल उदगीर तालुक्यात दाखल

- उदगीर तालुक्यात ढगफुटी; ९ जनावरे, ७ शेळ्या दगावल्या
- अनेक जनावरे, शेळ्या लेंडी नदीच्या पाण्यात वाहून गेल्या
- पशुसंवर्धन विभागाकडून जखमी जनावरांवर तातडीने उपचार

**लातूर** : उदगीर तालुक्यातील धडकनाळ, बोरगाव येथे १८ ऑगस्ट रोजी ढगफुटी सदृश्य पावसाने गावानजीकच्या लेंडी ओढ्याला पूर आला. अचानक आलेल्या पुरात ९ जनावरे व ७ शेळ्या वाहून गेल्याने दगावल्या. सकाळपर्यंतच्या पाहणीत मृत पशुंची संख्या दृष्टीस आली. आणखी बरेच जनावरे, शेळ्या दगावल्याची भीती व्यक्त केली जात आहे. पशुसंवर्धन विभागाने शीघ्र कृतीदल उदगीर तालुक्यात पाठवून जखमी जनावरांवर उपचार सुरू केले. वाहून गेलेल्या जनावरांच्या शोधासाठी मोहीम सुरू केली आहे.

पशुसंवर्धन विभागाने युद्धपातळीवर जखमी जनावरांना उपचार अन् वाहून गेलेल्या जनावरांचा शोध सुरू केला असला तरी नेमकी किती जनावरे दगावली, किती जखमी झाली, याचा नेमका आकडा समोर आला नाही. मात्र, पशुंचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याचे शेतकरी, पशूपालक सांगत आहेत. बऱ्याच जणांची जनावरे गायब झाली आहेत. आजारी, जखमी जनावरांवर तात्काळ उपचार सुरू केले असून, रोगप्रतिबंधक लसीकरण मोहीम हाती घेतली आहे.

पशुसंवर्धनचे सहाय्यक आयुक्त डॉ. कृष्णा पांडे, पशुधन विकास अधिकारी (विस्तार) डॉ. विजय घोणशीकर यांच्या नेतृत्वात सात शीघ्र कृतीदल धडकनाळ, बोरगाव येथे पाठविली आहेत. मृत जनावरांचे पंचनामे करून महसूल व पंचायत विभागाच्या मदतीने शास्त्रोक्त पद्धतीने विल्हेवाट लावण्यात आली.

आणखी किती पशू मृत पावले याचा आकडा हाती आलेला नाही. पशुसंवर्धन व दुग्ध व्यवसायचे उपायुक्त डॉ. श्रीधर शिंदे, लातूरचे पशुधन विकास अधिकारी डॉ. सुलेमान दायमी यांनी धडकनाळ, बोरगावला भेट देऊन पाहणी केली. पथकास सूचना दिल्या. परिस्थिती फार नाजूक असून, शेतकरी, पशूपालकांना उपायुक्त डॉ. शि[...] यांनी धीर दिला.



### पुरामुळे जनावरांत रोगप्रसार

पुरामुळे जनावरांमध्ये रोगप्रसार होऊ नये, तसेच पशुपालकांना तातडीची मदत मिळावी, यासाठी पशुसंवर्धन विभाग व इतर शासकीय विभाग प्रयत्न करीत आहेत. लातूर जिल्ह्यात अगोदरच लम्पी सदृश्य माहोल आहे. पुराने ही लम्पी साथ पसरण्याची शंका आहे. त्यासाठी काळजी घेण्याचे आवाहन उपायुक्त डॉ. श्रीधर शिंदे यांनी केले.

### धडकनाळ, बोरगावात पशुगणना

धडकनाळ येथे गायी १२१, म्हशी ११६, शेळ्या १०५ तर बोरगावात गायी २१७, म्हशी १४३, शेळ्या २५६ आहेत. दोन्ही गावात एकूण गायी ३३८, म्हशी २५९, शेळ्या ३६१, असे ९५८ पशुधन असल्याचे पशुसंवर्धन विभागाद्वारे सांगण्यात आले.

बोरगाव, धडकनाळात वीजयंत्रणेला फटका

चर्मरोग ग्रस्त पशुपालकांची घेतली माहिती; उपाययोजना करण्याच्या सूचना

# पशुसंवर्धन विभागाचे विभागीय सहआयुक्तांनी घेतला तालुकास्तरीय कामकाजाचा आढावा

प्रतिनिधी | खामगाव

तालुका पशुवैद्यकीय सर्व चिकित्सालय खामगाव येथे अमरावती विभागीय सह आयुक्त पशुसंवर्धन डॉ. येसुदेव वंजारी यांनी १२ ऑगस्ट रोजी भेट देऊन लम्पी चर्मरोग ग्रस्त जनावरांच्या पशुपालकांची माहिती घेतली. तसेच तालुक्यातील लम्पी चर्मरोग ग्रस्त जनावरांच्या ठिकाणी प्रत्यक्ष भेट देऊन सुरू असलेले उपचार जनावरांचे झालेले लसीकरण तसेच प्रतिबंधात्मक उपाय यांचा आढावा घेतला. त्यांनी पशुपालक यांना लम्पी चर्मरोग ग्रस्त जनावरांना विलगीकरण करून ठेवण्यासंबंधी तसेच त्यांचे चारा व पाणी यांची स्वतंत्र व्यवस्था करण्यासंबंधी सूचना केल्या.

डॉ. येसुदास वंजारी यांनी खामगाव तालुक्यामध्ये सुरू असलेल्या लम्पी चर्मरोगग्रस्त जनावरांच्या उपचारासंबंधी समाधान व्यक्त करून याच पद्धतीने उपाययोजना पुढे सुरू ठेवून तात्काळ लंम्पी चर्म रोगाचे नियंत्रण करणे संबंधी अधिकारी व कर्मचाऱ्यांना सूचना केल्या.

या दौऱ्यात पशुधन विकास अधिकारी डॉ. अमोल पडोळ, खामगाव पंचायत समितीचे डॉ. राजेश अवताडे उपस्थित होते. यापूर्वी विभागीय सह आयुक्त अमरावती विभाग यांनी खामगाव तालुका येथे भेट देऊन लम्पी चर्मरोग ग्रस्त जनावरांची आढावा घेतला होता तर तालुक्यातील मौजे रामनगर या परिसरात जाऊन तेथील आजारी जनावरांची पाहणी केली होती. खामगाव तालुक्यात ९९ जनावरे लम्पी चर्मरोग ग्रस्त



खामगाव तालुक्यात जनावरांची पाहणी करताना विभागीय सहआयुक्त.

### खामगावात पशुंवर उपचार सुरू

खामगाव तालुक्यातील लम्पी चर्मरोग ग्रस्त जनावरे संख्या ९९ असून, त्यापैकी ५६ जनावरे बरी झाली आहेत. तर ३ जनावरे मृत झाली आहेत. सद्यःस्थितीत ४० जनावरांवर उपचार सुरू आहेत तर ३ गंभीर रुग्ण आहेत. पशुपालकांना उपायोजनांबाबत सूचना केलेल्या आहेत. तर पशुसंवर्धन विभागातर्फे उपचार करण्यात येत आहे.

लोकमत

# पोळा साध्या पध्दतीने करावा...

लोकमत न्यूज नेटवर्क

**धुळे :** जिल्ह्यात लंपी चर्मरोगाचा प्रादुर्भाव लक्षात घेता यंदाचा पोळा सण साध्या आणि घरगुती पद्धतीने साजरा करावा, असे आवाहन जिल्हाधिकारी भाग्यश्री विसपुते यांनी केले आहे.

जिल्ह्यातील सर्व तालुक्यांमध्ये लंपीचर्मरोगाचा प्रादुर्भाव झाल्याचे निष्पन्न झाले आहे. या रोगाचा प्रसार वाढु नये यासाठी प्रतिबंधात्मक खबरदारी घ्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

**१** एकाच ठिकाणी गर्दी करणे टाळावे असे आवाहन केले आहे.

### ...तर प्रादुर्भाव होऊ शकतो...

पोळा सणाच्या दिवशी बैल एकत्रित जमा करुन साजरा केल्यास किंवा शर्यतीचे आयोजन करुन सण साजरा केल्यास लंपी चर्मरोगाचा प्रादुर्भाव वाढण्याची शक्यता नाकारता येत नाही.

### प्रशासनाकडून राहिल लक्ष...

पशुपालकांनी हा सण साध्या व घरगुती पद्धतीने साजरा करावा. पोळा सण सर्व पशुपालकांकडून साध्या पद्धतीने साजरा होईल याची संबंधित विभागांनी दक्षता घ्यावी. सार्वजनिक ठिकाणी गर्दी केल्यास रोगाचा प्रादुर्भाव होण्याची दाट शक्यता आहे. एकाच ठिकाणी गर्दी करणे टाळावे असे आवाहन जिल्हाधिकारी असेही जिल्हाधिकारी विसपुते यांनी आहे.

माध्यमांनी घेतलेली दखल

**पुण्यनगरी**

# दुग्ध व्यवसायामुळे शेतकऱ्यांच्या अर्थकारणाला गती

## पालकमंत्री आबिटकर: आदर्श गोठा उपक्रम राबविणाऱ्या शेतकऱ्यांचा सन्मान

कोल्हापूर : शेतीला दुग्ध व्यवसाय हा जोडव्यवसाय म्हणून पाहिले जात होते; मात्र आता जिल्ह्यात दुग्ध व्यवसायच मुख्य व्यवसाय होत असून, त्यामुळे शेतकऱ्यांच्या अर्थकारणाला गती मिळाली असल्याचे प्रतिपादन पालकमंत्री प्रकाश आबिटकर यांनी केले. उत्कृष्ट पशुपालक स्वच्छ व सुंदर गोठा अभियान शुभारंभ व आदर्श गोठा पुरस्कार वितरण कार्यक्रमात ते बोलत होते.

मंत्री आबिटकर म्हणाले, आज ज्या पशुपालकांचा आपण सत्कार करत आहे, त्यांचा होणारा सन्मान पाहून इतर दूध उत्पादक शेतकऱ्यांनीही त्यांचे अनुकरण करून दुग्ध व्यवसायात क्रांती केली पाहिजे, हा या कार्यक्रमाचा उद्देश आहे. स्वच्छ, सुंदर गोठा करण्यासाठी जनावरांची सेवा करत असताना दुग्ध ...



कोल्हापूर : शेतकऱ्यांना आदर्श गोठा पुरस्कार देताना पालकमंत्री प्रकाश आबिटकर. यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी कार्तिकेयन एस., संतोष जोशी, महेश शेजाळ, प्रमोद बाबर, अनिरुद्ध पिंपळे आदी.

### हेक्टरी १२५ टन ऊस उत्पादन योजना...

दरम्यान, शासनाकडून अनेक योजना शेतकऱ्यांसाठी राबवल्या जात असतात. मी पालकमंत्री म्हणून काम करत असताना पहिली महत्वाकांशी योजना म्हणून १२५ टन हेक्टरी ऊस उत्पादनाची योजना राबवली आहे. या योजनेसाठी कृषी विभागाकडून शेतकऱ्यांना योग्य ते मार्गदर्शन केले जाणार आहे. त्याचबरोबर जिल्ह्यातील ग्रामीण भागातील घरांचे प्रवेशद्वार स्वच्छ व सुंदर दिसण्यासाठीची योजनाही महत्त्वाची असून, ... जिल्हा परिषदेच्या माध्यमातून काम सुरू आहे. शेतकरी बंगळूरला अभ्यास दौऱ्यासाठी पाठवले ... अनुभवाचा फायदा जिल्ह्यातील इतर शेतकऱ्यांनीही घ्यावा, असे आवाहनही त्यांनी यावेळी केले.

आरोग्याचीही तितकीच काळजी घेण्याची गरज आहे. कोल्हापुरातून सुरू झालेला हा अभिनव उपक्रम राज्यभरात पोहोचला पाहिजे, यासाठी पशुसंवर्धन विभागातील अधिकाऱ्यांनी प्रयत्न करण्याचे आवाहन त्यांनी केले.

ते म्हणाले, काही भागात 'लम्पी'चा कहर सुरू असल्याच्या बातम्या येत आहेत. त्यामुळे कोल्हापूर जिल्ह्यात या 'लम्पी'चा ... यासाठी ...

**पुढारी**

# लंपीचा धोका होतोय कमी

सोलापूर : पुढारी वृत्तसेवा

जिल्ह्यात दोन हजार ३४४ जनावरांना लंपीची लागण झाली होती. त्यातील दोन हजार जनावरे बरी झाले असून, २८३ जनावरांवर उपचार सुरू आहे. तर ६६ जनावरांचा मृत्यू झाला आहे.

गेल्या काही दिवसात लंपीचा प्रार्दुभाव वाढत होता. मात्र, जिल्हा परिषदेच्या पशुसंवर्धन विभागाने जनावरांना लसीकरण आणि योग्यवेळी उपचार केल्याने लंपी आजार कमी झाले आहे. त्यामुळे सध्या जिल्ह्यात फक्त २८३ जनावरे लंपी बाधीत आहेत. तेही येत्या काही दिवसात बरे होणार असल्याची माहिती पशुसंवर्धन विभागाने दिले आहे. दरम्यान, जिल्ह्यातील लंपी चर्मरोग आजाराच्या वाढत्या प्रादुर्भावाच्या अनुषंगाने आयुक्त कार्यालयातील रोग नियंत्रण विभागाचे पशुसंवर्धन सहाय्यक आयुक्त डॉ. भगतसिंग कदम, रोग अन्वेषण विभागाचे प्रतिनिधी डॉ. प्रदीप रणवरे, डॉ. संजय पवार पंढरपूर, माळशिरस, सांगोला, अक्कलकोट आणि मंगळवेढा तालुक्यातील काही एपीसेंटरला भेट देऊन पशुपालक, संबंधित संस्था ...

### लंपी रोगाचे नमुने केले गोळा

पुणे येथील पशुसंवर्धन आयुक्त कार्यालयातील रोग नियंत्रण विभागाच्या अधिकाऱ्यांनी सोलापूर जिल्ह्यातील पंढरपूर, माळशिरस, अक्कलकोटसह अनेक तालुक्यांना भेटी देऊन लंपी झालेल्या जनावरांचे नमुने गोळा केले आहे. तसेच लंपी आजाराचा प्रार्दुभाव वाढू नये, यासाठी पशुपालकांना मार्गदर्शन केले.

"जिल्ह्यातील लंपी झालेल्या जनावरांची संख्या घटत आहेत. त्यातच रोग नियंत्रण विभागाच्या अधिकाऱ्यांनी लंपी बाधित क्षेत्रास भेटी देऊन जनावरांची पाहणी केली आहे. तसेच त्यांनी लंपी चर्मरोग संसर्गजन्य रोग प्रादुर्भाव नियंत्रणात आणण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यासाठी विविध सूचना दिल्या आहेत. त्याचे पालन करून संसर्गजन्य रोगाचा प्रादुर्भाव कमी करण्यात येईल.

-डॉ. विशाल येवले, जिल्हा उपआयुक्त

**तरुण भारत**

23 Aug 2025 - Page 8
epaper.tarunbharatlive.com

# जिल्हाभरात लम्पी साथरोग नियंत्रणात

## साधेपणाने बैलपूजन करीत सण साजरा करा- जिल्हा प्रशासन

तभा वृत्तसेवा
जळगाव, २२ ऑगस्ट

जुलै २०२५ च्या पुर्वार्धात गोवंशीय पशुधनावर सुरुवातीला तीन तालुक्यात व त्यानंतर संपूर्ण जळगाव जिल्ह्यात लम्पीचा प्रादुर्भाव झाला होता. पशुसंवर्धन आयुक्तालयाच्या मार्गदर्शक सूचनानुसार संसर्ग बाधित केंद्राच्या पाच किलोमीटर परिसरात गोवंशीय पशुधनास गोट पॉक्स, लम्पी प्रतिबंधात्मक लसीकरण मोहीम राबविण्यात आल्यामुळे लम्पी साथरोग नियंत्रणात असल्याचे पशुसंवर्धन उपायुक्त डॉ. प्रदीप झोड यांनी म्हटले आहे.

असे असले तरी लम्पी चर्मरोगाचा प्रादुर्भाव निरोगी पशुधनास होऊ नये, यासाठी प्रतिबंधात्मक उपाय म्हणून शुक्रवार दि.२२ ऑगस्ट रोजीच्या पोळा सणादरम्यान गोवंशांच्या मि...

### दिरंगाई आढळल्यास दंडात्मक कारवाई

लम्पी साथरोग हा अधिसूचित रोग असल्यामुळे प्रादुर्भाव नियंत्रणासाठी शासकीय, निमशासकीय आणि स्थानिक स्वराज्य संस्थाकडून कार्यवाही दिरंगाई किंवा अडथळा आढळल्यास प्राण्यांमधील संक्रमण आणि सांसर्गिक रोग प्रतिबंध तथा नियंत्रण अधिनियम २००९ मधील कलम ३१, ३२ आणि ३३ अन्वये दंडात्मक कारवाई करण्यात येईल, असा इशाराही जिल्हा प्रशासनाकडून देण्यात आला आहे.

स्वगुका टाळून, घरगुती पद्धतीने आपापल्या घरीच बैलपूजन करीत साजरा करावा, असे आदेश जिल्हा प्रशासनाने काढले आहेत.

**सद्यस्थितीत १२४ संसर्ग बाधीत केंद्र**

जुलै महिन्याच्या पूर्वार्धात एरंडोल तालुक्यात व नंतर जिल्ह्याच्या १५ तालुक्यात गोवंशीय पशुधनावर लम्पी चर्मरोगाचे संक्रमणाने विळखा घातला होता. संपूर्ण जिल्ह्यात १२४ संसर्गबाधीत केंद्र प्रतिबंधीत क्षेत्र म्हणून घोषीत आहेत.

**बाराशेहून अधिक पशुधन उपचारांअंती बरे**

लम्पीमुळे २ हजारांहून अधिक गोवंश बाधीत झाले आहेत. सद्यस्थितीत १ हजार ८३९ पशुधनावर उपचार सुरू असून आतापर्यंत १ हजार २२० पशुधन पूर्णपणे बरे झाले आहेत.

**बरे होण्याचे प्रमाण ६६ टक्के**

पशुसंवर्धन विभाग, जिल्हा परिषद प्रशासनांतर्गत ग्रामपंचायत स्तरावर गोठा स्वच्छता मोहीम, औषधी फवारणीसह पशुधनाचे लसीकरण व सुश्रुषा उपचारांमुळे बाधीत पशुधनाचे बरे होण्याचे प्रमाण ६६ टक्के पर्यंत पोचले आहे. याशिवाय ५४७ सक्रिय संसर्ग बाधीत पशुधन आहे.

**मृत्यूचे प्रमाण ३.१ टक्के**

संसर्गबाधेमुळे आतापर्यंत ७२ पशुधनाचा मृत्यू झाला असून मृत्यूचे प्रमाण सरासरी ३.१ टक्के असल्याचे पशुसंवर्धन विभाग अधिकाऱ्यांनी म्हटले आहे.

**ग्रामविकास अधिकारी, तलाठी, पशुपालकांनी दक्षता घ्यावी**

जिल्ह्यात शुक्रवार २२ ऑगस्ट रोजी बैलपोळा सण साजरा होणार आहे. या पार्श्वभूमीवर गोवंश ...



### पशुधन सुरक्षिततेची काळजी घेऊन सण साजरा करा

जिल्हात पशुसंवर्धन विभागाकडून लम्पी साथरोग नियंत्रणात आला असून प्रशासन आणि शेतकरी पशुपालकांसह सर्वांच्या सहकार्यातून लम्पीचा संसर्ग रोखणे ही सामूहिक जबाबदारी आहे. ... जाईल, त्यानुसार गोवंशाचे पूजन करीत मिरवणूक न काढता पोळा हा सण प्रसुती वडाळजात, सुरक्षितेची काळजी घेऊन साजरा करावा.

-आयुष प्रसाद
जिल्हाधिकारी जळगाव

**पुढारी**

# शेतकऱ्यांनी दुग्ध व्यवसायाकडे वळावे : जिल्हाधिकारी

वसमत, पुढारी वृत्तसेवा : जिल्ह्यात दररोज ३० हजार लिटर पेक्षा जास्त दूध बाहेर जिल्ह्यातून येत असल्याने आता जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी सामूहिक प्रयत्न करून जनावरे पाळावेत व दुग्ध व्यवसायाकडे वळावे, असे आवाहन जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी तालुक्यातील पांगरा शिंदे येथे पार पडलेल्या हेरिटेज दूध उत्पादक शेतकरी मेळावा प्रसंगी बोलताना व्यक्त केले.



लिटर दूध बाहेरून येते. परिणामी त्यामुळे हिंगोली जिल्ह्यातील शेतकऱ्यांचे नुकसान होत असल्याने आता जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी जनावरे पाळून दुग्ध व्यवसायाकडे वळावे, दूध उत्पादन वाढीसाठी सामूहिक प्रयत्न करावा. शासन योजनेचा लाभ घेऊन हे दूध उत्पादन वाढवावे तसेच बँकांनी देखील दूध उत्पादन करण्यासाठी शेतकऱ्यांना कर्ज ...

**लोकमत**

मस्ट READ

# हिंगोली दूध निर्यात करणारा जिल्हा व्हावा

## जिल्हाधिकारी गुप्ता यांची अपेक्षा, पांगरा येथे मेळावा

लोकमत न्यूज नेटवर्क

हिंगोली : शेतकऱ्यांनी शेतीबरोबर जोड व्यवसायाकडे वळणेही आवश्यक असून, दूध उत्पादन फायद्याचे ठरू शकते. त्यासाठी शेतकऱ्यांनी सामूहिक प्रयत्न ...



वसमत तालुक्यातील पांगरा शिंदे येथे बुधवारी दूध उत्पादक शेतकऱ्यांचा मेळावा घेण्यात ...

### जोड व्यवसाय आवश्यक

अलिकडच्या काळात एकापाठोपाठ येणाऱ्या नैसर्गिक संकटांमुळे पीक उत्पादनात प्रचंड घट होत आहे. त्यातच बाजारपेठेत भावही समाधानकारक मिळत नाही. परिणामी, शेतकरी संकटात सापडत आहे.

**देशोन्नती**

# धडकनाळ बोरगामध्ये नुकसानीचे पंचनामे युद्धपातळीवर सुरू

देशोन्नती वृत्तसंकलन

उदगीर – तालुक्यातील धडकनाळ बोरगाव येथे आलेल्या महा प्रलयकारी पुरामुळे मोठे नुकसान झाले आसून या नुकसानीत शेतकरी व पशूपालक कोलमडून पडला आहे. शेतकऱ्याच्या झालेल्या नुकसानीचे पंचनामे युद्धपातळीवर पंचनामे केली जात आहेत.

धडकनाळ बोरगावमध्ये महसुल प्रशासन, कृषीविभागाचे अधिकारी, पशुधन विभागाचे अधिकारी परस्थिती पूर्वपदावर आणण्यासाठी व झालेल्या नुकसानीचे पंचनामे करण्याचे काम युध्दपातळीवर चालू आहे. १८ ऑगस्ट रोजी झालेल्या अतिवृष्टीमुळे नुकसानग्रस्त झालेल्या बोरगाव बु. ता. उदगीर येथे पशुसंवर्धन विभागाच्या टीमने भेट दिली आसुन या गावात पशुधनाचे मोठयाप्रमाणावर नुकसान झाले आहे. झालेल्या

अतिवृष्टीमध्ये पुराच्या पाण्यात वाहून गेलेली व दगावलेले पशुधन. म्हैस २५, गाय ९, लहान जनावरे (वासरे) ७, शेळी २१६, कोंबड्या २५ एवढी लाखो रुपयाचे पशुधन दगाभल्याने शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आसून पैकी ७ शेळ्या व ९ म्हैश पावसामुळे मृत अवस्थेत आढळून आल्या.

अतिवृष्टीत सापडलेल्या ७ जनावरांवर उपचार करण्यात येत आहे. धडकनाळ बोरगावमध्ये पशुसंवर्धन विभागातील २७ अधिकारी व कर्मचारी सर्वेक्षणाच्या काम करीत आसून या साठी करण्यात यासाठी ६ टीम कार्यरत आहेत. या टीमने दि. १९ ऑगस्ट रोजी मोठयाप्रमाणावर लसीकरण करण्यात येत आहे लसीकरण करण्यासाठी पशुसंवर्धन विभागातर्फे मोठयाप्रमाणावर गावात लसीकरण व पशुधनांना साथीच्या रोगापासुन वाचविण्यासाठी लसीकरण करण्यात येत आहे.

यासाठी पशुसंवर्धनअधिकारी डॉ. विजय घोणसीकर गावात तळ ठोकून आहेत. धडकनाळ बोरगावमध्ये आलेल्या प्रलयकारी पुराने शेतीचे मोठे नुकसान केले आसून या पुरात व अतिवृष्टीत धडकनाळ येथे २१८ शेतकऱ्यांचे २२० हेक्टर शेतीतील पीकांचे नूकसान झाले आसून बोरगाव बु. येथे ४८४ शेतकऱ्यांचे ४८४ हेक्टर क्षेत्रावरील पीकांचे नुकसान झाले आहे. शेतीच्या नुकसानीचे क्षेत्र वाढण्याची शक्यता आसुन पंचनाम्याचे काम कृषी व महसुल विभागाकडून युध्दपातळीवर चालू आहे अजून पंचनाम्याचे काम चालुच आसल्याने अंतीम नुकसानीची माहिती स्पष्ट होवू शकली नाही. यासाठी तालुक कृषीअधिकारी संदीप वळुंडे यांच्यासह ग्राम महसूल अधिकारी, सहायक कृषी अधिकारी, ग्रामविकास अधिकारी यांचे मार्फत संयुक्त पंचनाम्याच काम सुरू आहे. धडकनाळ बोरगावमधील घरांचे ही मोठयाप्रमाणावर नुकसान झाले आसुन ६७ घरामध्ये पुराचे पाणी शिरल्यामुळे मोठ्याप्रमाणावर नुकसान झाले २८ घराचे नूकसान झाले एकूण ९५ घरांचे नूकसान झाले आहे त्याचे पंचनाम्या करण्याचे काम महसुल विभागाकडून चालू आसल्याने किती नुकसान झाले याची माहिति मिळु शकली नाही. **शिवसेनेचे जिल्हाप्र ब्रम्हाजी केंद्रे व माजी आमदार गोविंद केंद्रे यांनी नुकसानीची केली पाहणी**





धडकनाळ बोरगाव येथे झालेल्या नुकसानीची पाहणी शिवसेनेचे जिल्हाप्रमुख ब्रम्हाजी केंद्रे व माजी आ. गोविंद केंद्रे यांनी पाहणी करून नुकसानग्रस्तांना दिलासा देण्याचे काम केले.

यावेळी त्यांनी नुकसानग्रस्तांना जास्तीत जास्त मदत तात्काळ देण्यासाठी प्रयत्न करण्याचे आश्वासन त्यांनी यावेळी ग्रामस्थाना दिले.

यावेळी माजी जिल्हापरिषद सदस्य बापु राठोड उपस्थित होते.

**तालूक्यात ही मोठ्या प्रमाणावर नुकसान**

तालुक्यात या अतिवृष्टीने मोठयाप्रमाणावर नुकसान झाले आसून यात ४९७२ शेतकऱ्यांचे ४२५७.९ हेक्टर शेतातील पीकांचे नुकसान झाले आसून तालुक्यात अतीवृष्टीने ५७ घराचू नूकसान झाले आहे




# खिलार : महाराष्ट्राच्या पशुधनाचा मानबिंदू

महाराष्ट्रातील अस्सल खिलार बैल जातीचे मूळस्थान / आढळस्थान म्हणून आटपाडी तालुक्याकडे पाहिले जाते. खिलार बैलाच्या रंगावरून हलम खिलार आणि कोसा खिलार असे दोन प्रमुख प्रकार मानले जातात. पांढराशुभ्र रंग, काळपट टोकी शिंगे, काळ्या नाकपुड्या, काळ्या पापण्या, काजळ घातल्यासारखे डोळे, काळे खूर, वशिंड, रुंद छाती, लांबसडक शरीरयष्टी ही खिलार बैलाची काही प्रमुख वैशिष्टे आहेत. हे बैल मुख्यतः जत, सांगोला, पंढरपूर, करगणी, कवठेमहांकाळ व कर्नाटक सीमेवरच्या बाजारात पहावयास मिळतात. खरसुंडी येथे माघ / चैत्र पौर्णिमा व करगणी येथे रामनवमी या दिवशी अस्सल खिलार जनावरांचे प्रदर्शन व यात्रा भरते. या प्रदर्शनात देशभरातील खिलारप्रेमींची गर्दी उसळते.



**डॉ. अजयनाथ थोरे**
जिल्हा पशुसंवर्धन
उपआयुक्त, सांगली



**डॉ. अविनाश चव्हाण**
पशुधन विकास अधिकारी
(विस्तार), पंचायत समिती,
आटपाडी जि. सांगली

महाराष्ट्रामध्ये प्रामुख्याने खिलार, देवणी, डांगी, लाल कंधारी, गवळाऊ, कोकण कपिला अशा सहा स्थानिक गोवर्गीय जाती आढळतात. यापैकी मध्यम आकाराची, रुबाबदार, चपळ, देखणी, पांढरीशुभ्र, पाहताक्षणी नजरेत भरणारी जात म्हणजे खिलार होय. खिलार या शब्दाचा अर्थ गाईंचा कळप असा होतो. सातपुडा पर्वतरांगांमध्ये या प्रजातीला थिलारी असेही म्हणतात.

शंभूपुत्र छत्रपती शाहू महाराज यांचे कारभारी श्रीनिवास पंतप्रतिनिधी औंध यांच्या काळात या जातीची संख्यात्मक व गुणात्मक वाढ झाली, असे मानले जाते. सन १७२५ ते १७२७ यादरम्यान मराठा सैन्याने मैसूरवर स्वारी केली होती. तेथे शेती कामासाठी व ओढ कामासाठी हलीकर व अमृतमहल या जाती वापरल्या जात होत्या. या जाती आटपाडीमध्ये आणल्या गेल्या व येथे १८७६ पर्यंत त्यांची पैदास करून सुमारे दीड हजार गाई-बैलांची निर्मिती करण्यात आली. ही निर्माण झालेली जात म्हणजेच आटपाडी खिलार.

खिलार ही जात कर्नाटक मधील बेळगाव, विजापूर, धारवाड, गुलबर्गा व बागलकोट या जिल्ह्यांमध्ये आढळून येते. तसेच मोठ्या प्रमाणावर महाराष्ट्रातील सोलापूर, सांगली, सातारा, कोल्हापूर, उस्मानाबाद, व पुणे या जिल्ह्यांमध्ये खिलार जातीचे आढळस्थान आहे.

झेबू कॅटल ऑफ इंडिया अँड पाकिस्तान या पुस्तकामध्ये खिलार जातीच्या खालील चार उपजातींचे वर्णन आहे.

**१. आटपाडी महल/हनम**

**२. म्हसवड खिलार**

**३. तापी खिलार**

**४. नकली खिलार**

BAIF Development research foundation या संस्थेने NBAGR, Karnal सोबत केलेल्या सर्वेमध्ये खिल्लार जातीमध्ये नऊ उपजाती असल्याचे दिसून आले.

**१. आटपाडी खिलार**

**२. म्हसवड खिलार**

**३. कोसा खिलार**

**४. नकली खिलार**

**५. पंढरपुरी खिलार**

**६. धनगरी खिलार**

**७. ब्राह्मणी खिलार**

**८. डफळ्या खिलार**

**९. हरण्या खिलार**

खिलार गोवंशाच्या उपजाती या नैसर्गिकरित्या स्थानिक वातावरण व शेतकऱ्याची निवड यानुसार जोपासल्या गेल्या आहेत. या प्रजातींचे स्वत:चे असे अंगभूत वेगवेगळे वैशिष्ट्य आहे. त्यानुसार या प्रजातीच्या एकूण नऊ उपजाती सध्या महाराष्ट्र पठारावर आढळून येतात. या प्रजाती स्थानिक वातावरणात उत्तमप्रकारे तग धरुन राहतात.









- ❖ ज्या खिलार जनावरांमध्ये नाकापुडी, पापण्या, शिंगे, शेपूट गोंडा व खुरे हे सर्व काळे असते अशा खिल्लार जनावरास **काजळी खिलार** असे म्हटले जाते.
- ❖ ज्या खिलार जनावरांत वरील पाचही अवयव गाजरी रंगाचे असतात अशा खिलार जनावरास **गाजरी खिलार** संबोधले जाते.
- ❖ जे खिलार जनावर पूर्णपणे (नखशिखांत) काळे आहे, अशा खिलार पशुधनास **कपिला खिलार** असे म्हटले जाते.










### शारीरिक गुणधर्म

खिलार जातीचे शरीर मजबूत व सडपातळ असते, शिंगे लांब पातळ व तलवारीसारखी असतात. कान लहान, टोकदार व जमिनीला समांतर असतात. रंग पांढराशुभ्र किंवा हलकासा राखेसारखा असतो. वशिंड मध्यम आकाराचे व पाठ सरळ असते. शेपूट मागील पायाच्या गुडघ्यापर्यंत लांब व शेपूट गोंडा काळा असतो. चेहरा सरळ, पसरट कपाळ, पाणीदार डोळे व काळसर भुवया असतात. पाय सरळ मजबूत व खुर काळे आणि कणखर असतात.

### दूध उत्पादन क्षमता

- ❖ गाय दिवसाला २.५ लिटर ४.२ % फॅट असलेले दूध देते.
- ❖ प्रती वेत ४५० लिटर दूध उत्पादन क्षमता
- ❖ दुग्ध काळ १७९ दिवसांचा असतो.

### वजन

- ❖ गाईचे वजन सरासरी ३०० किलोपर्यंत असते.
- ❖ बैलांचे वजन साधारणतः ४०० किलोपर्यंत असते.
- ❖ पैदाशीच्या वळूचे वजन ४५० किलोग्रामपर्यंत भरते.
- ❖ वासरांचे जन्मताच वजन २१ ते २५ किलो तर सहा महिन्यांनी ८० किलो व बारा महिन्यांनी सर्वसाधारणपणे १४३ किलो वजनाची वासरे तयार होतात.

### प्रजनन

- खिलार गाईमध्ये पहिल्या माजाचे वय ३७ ते ३८ महिने असून माजाचा काळ १८ ते २० तास असतो.
- कालवडींच्या पैदाशीचे वय ४० ते ४२ महिने व प्रथम वेताचे वय ५० महिन्यांपर्यंत असते.
- गाईंमध्ये दोन वेतातील अंतर १७ ते १८ महिने व सरासरी वेतांची संख्या चार ते दहा अशी दिसून आलेली आहे.
- सरासरी गर्भधारणेसाठी १.४ ते १.६ कृत्रिम अथवा नैसर्गिक रेतन लागते. म्हणजेच खिलार जनावरांची प्रजनन क्षमता उत्कृष्ट असते.

**Slogans :-**

1. Khillar - A new flame of life.
2. Khillar - Pride of Maharashtra.
3. Khillar - Deccancha RAJA.

**काम करण्याची क्षमता**

खिलार जनावरांची काम करण्याची क्षमता उत्तम आहे. सरासरी १३०० ते १४०० किलो वजन सहज १८ ते २० किलोमीटर ते वाहून नेऊ शकतात. रोजचे आठ ते नऊ तास न थकता बैल काम करू शकतात. साधारणतः नऊ ते दहा तासात एक एकर शेत एक बैल जोडी नांगरू शकते. खिलार जनावराची ०.५ ते ०.७ HP इतकी कार्यक्षमता असते.

**खिलार जनावरांची उपयोगिता**

खिलार जनावरे ही काटक व चपळ असल्यामुळे माळरान व खडकाळ जमिनीवर ती शेती निगडित कामे व शेतात मेहनत करण्यासाठी त्यांचा वापर सर्रास शेतकरी करतात. वाहतूक करणे, मोट ओढणे, घाना चालवणे, ऊस वाहतूक करणे इत्यादी कामांसाठी त्यांचा मोठ्या प्रमाणावर उपयोग केला जातो. काही खिलार गायी दिवसाला पाच ते सात लिटर दूध देऊ शकतात. ही जात दूध उत्पादनासाठीदेखील उपयुक्त ठरू शकते. पशुप्रदर्शने, विविध सण-उत्सव साजरा करणे, बैलगाडा शर्यती यासाठी या जातीचा स्थानिक शेतकरी मोठ्या प्रमाणात उपयोग करतात.


तसेच नैसर्गिक शेतीसाठी व शाश्वत शेंद्रीय शेतीसाठी खिलार जनावरांचा मोठ्या प्रमाणावर उपयोग होऊ शकतो. त्यामुळे मानवी जीवनामध्ये खिलार गाईचे महत्व अनन्य साधारण आहे व भविष्यात शाश्वत शेंद्रीय शेती करण्यासाठी खिलार गाई संगोपनाशिवाय पर्याय दिसून येत नाही.


ब्राह्मणी खिलार


डफळ्या खिलार


हरण्या खिलार


काजळी खिलार


गाजरी खिलार

# कुक्कुटपालन प्रशिक्षणातून ग्रामीण विकासाला नवी दिशा





डॉ.वैभव पाटील
पशुधन विकास अधिकारी
सघन कुक्कुट विकास गट, धाराशिव



पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय विभाग धाराशिव
सघन कुक्कुट विकास गट
कुक्कुट प्रशिक्षण प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की श्री /श्रीमती [redacted] यानी सघन कुक्कुट विकास गट धाराशिव याचे मार्फत दिवसीय कालावधीत आयोजित कुक्कुट प्रशिक्षण कार्यक्रमामध्ये प्रशिक्षणार्थी म्हणून सहभाग नोंदवून प्रशिक्षण यशस्वीरित्या पूर्ण केले त्या करिता सदरचे प्रशिक्षण प्रमाणपत्र देण्यात येत आहे

धाराशिव (पुर्वीचा उस्मानाबाद जिल्हा) हा मराठवाड्यातील अवर्षणग्रस्त जिल्हा असल्यामुळे पारंपारिक शेतीवरच येथील लोकांची उपजिविका निर्भर आहे. निसर्गाच्या लहरीपणामुळे शाश्वत उत्पन्न मिळत नसल्याने येथील लोकांनाही रोजगाराची शोधाशोध करावी लागत होती. या पार्श्वभूमीवर, महाराष्ट्र शासनाच्या पशुसंवर्धन विभागातंर्गत असलेल्या "सघन कुककूट विकास गट धाराशिव" या संस्थेने कुक्कुटपालन प्रशिक्षण शिबिर आयोजित करून कुक्कुटपालनाच्या माध्यमातून शेतकरी बांधवांचे जीवनमान उंचावण्याचा प्रयत्न केला.

**कुक्कुटपालन प्रशिक्षणाचे फायदे:**

१. **शास्त्रीय माहिती:** कुक्कुटपालनाचे शास्त्रीय ज्ञान मिळाल्याने पशुपालकास व्यवसायाचे शास्त्रोक्त व्यवस्थापन करणे शक्य होते.

२. **व्यवसायाची माहिती:** अंड्यांसाठी (लेअर), मांसासाठी (ब्रॉयलर), सुधारित देशी कोंबड्यांचे संगोपन, हॅचरीचा व्यवसाय याबद्दल सविस्तर माहिती मिळते.

३. **उत्पादन वाढ:** प्रशिक्षण घेतल्याने आधुनिक तंत्रज्ञान आणि योग्य व्यवस्थापन इ. माहिती मिळते; ज्यामुळे अंड्यांचे व -



मांसाचे उत्पादन वाढते. प्रशिक्षणाच्या माध्यमातून मिळालेल्या ज्ञानाने खर्चात कपात व विक्रीत वाढ झाल्यामुळे नफ्याचे प्रमाण वाढते.

**रोजगार निर्मिती:** स्वतःचा व्यवसाय सुरू करण्याची संधी मिळते किंवा पोल्ट्री फार्ममध्ये नोकरी मिळू शकते.

**जोखीम व्यवस्थापन:** रोगांचा प्रादुर्भाव आणि इतर समस्यांवर नियंत्रण मिळवता येते, ज्यामुळे व्यवसायातील जोखीम कमी होते.

**सरकारी योजना:** प्रशिक्षण पूर्ण केल्यानंतर अनेकदा सरकारी योजनांचा लाभ मिळवण्यासाठी प्रशिक्षण प्रमाणपत्र आवश्यक असते. हे प्रमाणपत्र सदर प्रशिक्षण उत्तीर्ण झाल्यावर मिळत असल्याने योजनेचा लाभ घेण्यास मदत होते.

**समस्या निराकरण:** कुक्कुटपालनातील येणाऱ्या अडचणींवर उपाययोजना आणि रोग प्रतिबंधक उपायांबद्दल मार्गदर्शन मिळते.

**उद्दिष्ट आणि तयारी:**

या प्रशिक्षण कार्यक्रमांचे मुख्य उद्दिष्ट ग्रामीण भागातील शेतकरी, महिला बचत गट आणि बेरोजगारांना कुक्कुटपालनाचे आधुनिक तंत्रज्ञान शिकवून त्यांना स्वयंरोजगारासाठी सक्षम करणे हे होते. लातूर विभागाचे सहआयुक्त पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय विभाग डॉ. नानासाहेब सोनवणे आणि जिल्हा उपआयुक्त पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय धाराशिव डॉ. मनोज घाटे यांचे सुचनेप्रमाणे व मार्गदर्शनाखाली सघन कुक्कुट विकास गट धाराशिव संस्थेने प्रशिक्षण शिबिरांचे आयोजन करण्याचे निश्चित केले. प्रशिक्षण शिबिरांच्या आयोजनासाठी संस्थेचे अधिकारी / कर्मचारी यांनी तसेच धाराशिव जिल्ह्यातील विविध पशुवैद्यकीय दवाखान्यातील कार्यरत अधिकारी कर्मचारी यांनीही पुढाकार घेउन ग्रामस्तरावरती कुक्कुट प्रशिक्षणाचे महत्त्व समजावून सांगून त्याबद्दल ग्रामस्तरावरती प्रचार प्रसिद्धी केली. तसेच धाराशिव जिल्ह्यातील पशुधन विकास अधिकारी, कुक्कुटव्यवसायात काम करणारे विविध मान्यवर आणि यशस्वी कुक्कुटपालक यांना मार्गदर्शक म्हणून आमंत्रित करण्यात आले.

प्रशिक्षणार्थींना कुक्कुटपालनाचे महत्त्व, त्यासाठी आवश्यक असणारे भांडवल, जागेची निवड, कोंबड्यांच्या जाती, आहार व्यवस्थापन, लसीकरण, रोग प्रतिबंधक उपाय आणि बाजारपेठेची माहिती यांसारख्या विविध पैलूंवर सखोल मार्गदर्शन करण्याचे नियोजन करण्यात आले. प्रशिक्षणासाठी उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. धाराशिव जिल्ह्यातील विविध गावातील शेतकरी, महिला आणि तरुणांनी मोठ्या उत्साहात सहभाग घेतला. तसेच धाराशिव जिल्ह्याबाहेरील पशुपालकांनी ही उस्फूर्तपणे प्रशिक्षणासाठी प्रतिसाद नोंदवला. तज्ज्ञांनी पॉवरपॉईंट सादरीकरण, प्रात्यक्षिके आणि प्रश्नोत्तरांच्या माध्यमातून प्रशिक्षणार्थी यांना माहिती दिली. तसेच जे प्रशिक्षणार्थी कुक्कुटपालन करीत आहेत, अशा कुक्कुट व्यावसायिकांनी त्यांना येत असलेल्या अडचणी व त्यावरील करावयाच्या उपाययोजनांबाबत माहिती करून घेतली व कुक्कुटव्यवसाय शात्रोक्त पद्धतीने करण्याचा मानस व्यक्त केला.



**प्रशिक्षणाचे परिणाम व यश:**

प्रशिक्षण शिबिरानंतर, अनेक प्रशिक्षणार्थींनी कुक्कुटपालनाचा व्यवसायास सुरुवात केली. सुरुवातीला काही अडचणी आल्या असल्या तरी, प्रशिक्षणात मिळालेल्या ज्ञानामुळे त्यांनी त्यांवर मात केली. आज, या शिबिरातून प्रशिक्षित झालेल्या अनेक व्यक्ती यशस्वी कुक्कुटपालक म्हणून ओळखल्या जातात. त्यांनी केवळ स्वतःसाठीच नाही, तर इतरांसाठीही रोजगाराच्या संधी निर्माण केल्या आहेत. गावातील अनेक कुटुंबांचे उत्पन्न वाढले आहे, जीवनमान सुधारले आहे आणि आर्थिक स्थैर्यही त्यांना प्राप्त झाले आहे. कुक्कुटपालनामुळे त्यांचे शेतीवरील अवलंबित्व कमी करण्यास मदत झाली आहे आणि पूरक उत्पन्नाचा एक चांगला स्रोत त्यांना उपलब्ध झाला आहे.



**प्रशिक्षणाचे स्वरूप:** कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभागाकडील शासन निर्णय क्रमांक कुक्कुट २०२३/प्र क्र ११ पदुम ४ मंत्रालय मुंबई दि १२.२.२०२५ अन्वये पशुपालकांच्या मागणीनुसार ५ दिवसांचे ऑनलाईन प्रशिक्षण सघन कुकूट विकास गट धाराशिव या संस्थेमार्फत आयोजित करण्यात आले.

| अ. क्र. | प्रशिक्षणाचा कालावधी | आकारावयाचे सेवाशुल्क (रु) | प्रशिक्षण पध्दती |
|---|---|---|---|
| १ | ५ दिवस | २००/- | ऑनलाईन / ऑफलाईन |
| २ | १५ दिवस | ५००/- | ऑनलाईन / ऑफलाईन |
| ३ | ३० दिवस | २०००/- | ऑफलाईन |
| ४ | ६ महिने | ४०००/- | ऑफलाईन |

# परसातील कुक्कुटपालन: शाश्वत उत्पन्नाचे किफायतशीर साधन





**डॉ. अतुल पाटणे** (M.V.Sc., Poultry Science)
सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन,अकोले,
जि. अहिल्यानगर

भारत हा कृषिप्रधान देश आहे, शेती हा आपला पारंपारिक मुख्य व्यवसाय आहे आणि त्यासोबत पशुपालन हा शेतीचा अगदी जुन्या काळापासून प्रचलित असलेला जोडधंदा आहे. परंतु, बदलत्या काळानुसार अवकाळी पाऊस, दुष्काळ, पिकांवर वाढत चाललेली रोगराई व वाढती लोकसंख्या लक्षात घेता वाट्याला कमी येत असलेली जमीन, यामुळे शेती हा मुख्य व्यवसाय करणे अवघड झाले आहे. त्यामुळे अलीकडे पशुपालन हा जोडधंदा न राहता मुख्य व्यवसाय बनत चाललेला आहे. बरेच शेतकरी पशुपालनामध्ये मुख्यतः दूधउत्पादन, शेळीपालन व कुक्कुटपालन हे व्यवसाय उद्योग म्हणून करू लागले आहेत. त्यामध्ये आता अलीकडच्या काळात कुक्कुटपालन हा देखील पशुपालनातील सर्वात वेगाने वाढणारा व कमी वेळेत जास्त नफा देणारा व्यवसाय आहे.

परसातील कुक्कुटपालन ही संकल्पना आपल्यासाठी नवीन नाही. आपण सर्वजण खूप पूर्वीपासून **परसातील कुक्कुटपालन** जोडधंदा म्हणून करत आहोत. १५-२० कोंबड्या घराच्या अंगणात किंवा मागील बाजूस दिवसभर मोकळ्या सोडून त्यांना घरातील शिळे, उरलेले किंवा खराब झालेले अन्न किंवा धान्य टाकून आपण त्यांना वाढवतो व ठराविक दिवसानंतर त्यापासून मिळणारे अंडी किंवा मांस आपण घरी खातो किंवा विकतो. या प्रकारे आपण परसातील कुक्कुटपालन आत्तापर्यंत करत आलेलो आहोत. परंतु आता हा व्यवसाय पारंपारिक पद्धतीने न करता आधुनिक पद्धतीचा अवलंब करून परसातील कुक्कुटपालन करून आपले आर्थिक राहणीमान उंचवायचे आहे. प्रथमतः आपण हे समजून घेऊया की कुक्कुटपालन व्यवसायाच का निवडायचा आहे?

- सहज करता येणारा व्यवसाय असून, घरातील महिला किंवा वयस्कर व्यक्तीदेखील करू शकतात.
- कमी वेळेत, कमी खर्चात जास्तीत जास्त नफा मिळवून देणारा व्यवसाय आहे.
- अंडी व मांस असे दुहेरी उत्पादन घेता येऊ शकते व त्यापासून .....

- शेतीसाठी नैसर्गिक खत मिळू शकते.
- शेतीहीन / अल्पभूधारक हा व्यवसाय करू शकतो.

**कुक्कुटपालन व्यवसायास भविष्यात चालना देणाऱ्या बाबी**

१. वाढत्या लोकसंख्येची आहाराची वाढती गरज अंडी व मांस यातून बऱ्याच प्रमाणात भागवता येऊ शकते.

२. कोंबड्यांचे अंडी व मांस हे प्रथिनांचा सर्वात स्वस्त स्त्रोत आहे.

३. या व्यवसायातून स्वयंरोजगाराची संधी उपलब्ध होऊ शकते.

४. कमी जागेत सुरू करण्यासारखा हा व्यवसाय आहे.

५. राज्य व केंद्र सरकारकडून कुक्कुटपालन व्यवसाय सुरू करण्यास देण्यात येणारे अनुदान.

**कुक्कुटपालन व्यवसायाचे प्रकार-**

१. ब्रॉयलर फार्मिंग- मांस उत्पादन साठी

२. लेअर फार्मिंग- अंडी उत्पादन साठी

३. अंडी उबवणी युनिट- पिल्ले तयार करण्यासाठी

४. ग्रोइंग पक्षी फार्मिंग- अंडी घालण्यासाठी तयार पक्षी विकणे

५. सुधारित देशी पक्षी फार्मिंग/ परसातील कुक्कुटपालन

आतापर्यंत आपण पारंपारिक पद्धतीने थोड्याफार कोंबड्या पाळून परसातील कुक्कुटपालनाचा जोडधंदा करत आलेलो आहोत. परंतु, आता व्यावसायिक दृष्टिकोन समोर ठेवून जास्तीत जास्त आर्थिक नफा मिळवण्याच्या हेतूने आधुनिक पद्धतीने परसातील कुक्कुटपालन करणे गरजेचे आहे. त्यासाठी कोंबड्यांच्या व्यवस्थापनामध्ये पुढील काही महत्त्वाच्या बाबींचे अंमलबजावणी करणे आवश्यक आहे.

- **कोंबडीची निवड**

चांगल्या प्रतीच्या व जास्त उत्पादन देणाऱ्या सुधारित देशी प्रजातीचे कुक्कुट पक्षी पालनास प्राधान्य द्यावे. उदा. कावेरी, गिरीराज, वनराज, डीपी क्रॉस

- **आहार**

कोंबड्यांना नुसते शिळे, उरलेले व वाया गेलेले अन्न किंवा धान्य न देता त्यांना संतुलित व पौष्टिक आहार तसेच स्वच्छ पाणी द्यावे; जेणेकरून त्यांची वाढ लवकर झपाट्याने होईल. यामुळे कालावधीत उत्पन्न सुरु होईल.

- **सुरक्षितता**

कोंबड्यांना असेच मोकळे किंवा उघड्यावर न ठेवता त्यांना किमान साधे शेड किंवा निवारा करावा; जेणेकरून त्यांचे ऊन पाऊस किंवा वादळापासून संरक्षण होईल. तसेच परस बागेत किंवा शेडच्या भोवती कुंपण करावे, ज्यामुळे इतर प्राणी किंवा पक्षी यांच्यापासून कोंबड्यांचे रक्षण होईल.

- **स्वच्छता**

खुराडे, पिंजरे किंवा शेडमध्ये नियमित व व्यवस्थित स्वच्छता करावी. खाद्याची किंवा पिण्याच्या पाण्याची भांडी नियमित धुवावी त्यामुळे रोगराई टाळता येईल.

- **रोग नियंत्रण**

आपल्या शेडमध्ये कोंबड्यांना कोणताही रोग होऊ नये म्हणून कोंबड्यांवर नियमित लक्ष ठेवावे व महत्त्वाच्या रोगांचे लसीकरण करावे तसेच गरजेनुसार औषधे द्यावेत.

- **अंडी व खुडूक कोंबडी चे व्यवस्थापन**

बऱ्याचदा परसातील कोंबड्यांनी अंडी इकडे तिकडे घातल्यामुळे हरवून जातात किंवा फुटत असतात. त्यामुळे अशा अंड्यावरील कोंबड्यांना शेडमध्ये निश्चित अशी अंडी घालण्याची जागा किंवा नेस्ट (बॉक्स) करून द्यायचा आहे. तसेच खुडूक असलेली कोंबडी ओळखून तिला वेगळी करून अशा इतर देखील खुडूक कोंबड्या वेगळ्या करून एकत्रित त्यांना उबवणुकीसाठी अंड्यावर ठेवायचे आहे, जेणेकरून जास्तीत जास्त पिल्ले एकाच वेळी एकाच वयाची मिळतील.

- **पिल्लांचे व्यवस्थापन**

हा देखील व्यवस्थापनाचा महत्त्वाचा भाग असून, पिल्लांना कमीत कमी सुरुवातीचे १ ते २ महिने बंदिस्त पद्धतीने संगोपन करायचे आहे व त्यांना त्या काळात प्रथिनयुक्त खाद्य दिल्यास व आवश्यक लसीकरण केल्यास पुढे जाऊन होणारी मरतूक कमी होऊन वेळेत वयात येण्यास व अंडी देण्यास सुरुवात होईल.

- **नर कोंबडा व्यवस्थापन**

हा देखील आपल्याकडून दुर्लक्ष होणारा महत्त्वाचा व्यवस्थापनाचा भाग आहे. नर कोंबडा पहिले ६ महिने इतर मादी कोंबड्यांपासून वेगळे संगोपित करायचे आहेत व त्यानंतर एकत्र ठेवण्यास सुरुवात करावी म्हणजे तेथून पुढे फलित अंडी (Fertile Eggs) मिळण्यास सुरुवात होईल व फलित अंड्यांचे प्रमाण असेच चांगले ठेवण्याकरिता दर १ वर्षांनी नर कोंबडा बदलावा आणि किमान १० ते १५ मादी कोंबडी मागे १ नर कोंबडा असावा, असे प्रमाण आवश्यक आहे.

अशाप्रकारे वरील महत्त्वाच्या बाबींचा आपल्या व्यवस्थापनात अवलंब करून अर्धबंदीस्त पद्धतीने जर परसातील कुक्कुटपालन केले तर नक्कीच आपला व्यवसाय काही काळानंतर उद्योगात रूपांतर झाल्याशिवाय राहणार नाही.

# दुभत्या गायींसाठी कॅल्शियम पूर्ततेची खरी गरज
# लिक्विड कॅल्शियम की खनिज मिश्रण?



आजकाल बाजारात उपलब्ध असलेली अनेक “लिक्विड कॅल्शियम” उत्पादने प्रत्यक्षात गायींना आवश्यक कॅल्शियम देण्याऐवजी जास्त करून साखर, ग्लुकोज (ऊर्जेचा) चा पुरवठा करतात. त्यामुळे शेतकऱ्यांची दिशाभूल होते. खरं तर दैनंदिन शारिरीक क्रिया सुरळीत राहण्यासाठी, प्रजननासाठी आणि दूधनिर्मितीसाठी सर्व खनिजांची आवश्यकता असते. मात्र, मोठ्या जनावरांच्या उपचारात कॅल्शियमचा वारंवार वापर होत असल्याने या खनिजांना अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त झाले आहे.



**डॉ. हर्षल निळकंठ रेवतकर**
पशुधन विकास अधिकारी
पशुवैद्यकीय चिकित्सालय तितूर,ता. कुही, जि.नागपूर

गायींमध्ये कॅल्शियम हा दुधनिर्मिती, हाडांचे स्वास्थ्य, स्नायूंची हालचाल, रक्तातील संतुलन व प्रजनन कार्यक्षमतेसाठी अत्यावश्यक घटक आहे. विशेषतः उच्च उत्पादन देणाऱ्या गायींसाठी रोजच्या कॅल्शियम पूर्ततेचे शास्त्रीय नियोजन आवश्यक आहे.

**१. दुभत्या गायीची कॅल्शियम गरज (BIS मानकांनुसार)**

(४०० किलो वजनाच्या गायीचा अंदाज धरलेला)

शरीरासाठी कायमची गरज → ~१६ g कॅल्शियम

१० लि. दूधासाठी (१.२ g/लीटर दूध) → ~१२ g कॅल्शियम

म्हणजे १० लि. दूध देणाऱ्या गायीची गरज ~२८ g कॅल्शियम/day

१५ लि. दूध → ~३४ g कॅल्शियम /दिवस

२० लि. दूध → ~४० g कॅल्शियम/दिवस

**२. चारा व खाद्यातून मिळणारे कॅल्शियम**

हिरवा चारा (१० kg) → ~६.२५ g

कोरडा चारा (५ kg) → ~५.६३ g

पशुखाद्य (३-५ kg) → ~१०§१८ g

खनिज मिश्रण (५० g, कॅल्शियम २५%) → ~१२.५ g

**उदाहरण**

५ kg पशुखाद्य + १० kg हिरवा चारा + ५ kg कोरडा चारा + ५० g खनिज मिश्रण = ~४२ g कॅल्शियम/दिवस

**म्हणजेच,**

२० लि. दूध देणाऱ्या गायीचीही गरज चाऱ्यातून आणि खनिज मिश्रणातूनच सहज भागते.

खनिज मिश्रण डोज - ५०-७५ g/day

### ३. लिक्विड कॅल्शियमचे सत्य काय?

बाजारातील बहुतेक लिक्विड कॅल्शियममध्ये १०० ml = फक्त १.७-३.५ g कॅल्शियम असतो. प्रत्यक्ष पूर्ततेसाठी गायीला ३०-४० g कॅल्शियम लागते. म्हणजे १ लिटरपेक्षा जास्त लिक्विड द्यावे लागेल, जे आर्थिक दृष्ट्या परवडणारे नाही.

काही वेळा लिक्विड कॅल्शियम दिल्यावर दूध वाढल्याचे दिसते. याचे कारण आहारातील ऊर्जेची कमतरता असते (असंतुलित ऊर्जा रहित आहार असेल तर). जी ह्या लिक्वीड कॅल्शियम मुळे भरून निघून थोड्या प्रमाणात दूध वाढते. लिक्विड कॅल्शियममध्ये असलेले ग्लुकोज / ग्लिसरॉल हे फक्त ऊर्जेचा तात्पुरता स्रोत ठरतात, दीर्घकालीन कॅल्शियम पूर्तता मात्र होत नाही.

### ४. लिक्विड कॅल्शियम कधी उपयुक्त?

प्रसवोत्तर (calving नंतर) काळात आहार बदलल्यावर किंवा भूक मंदावल्यास पण अशा वेळेस साधा गूळ दिला तरी तोच परिणाम मिळतो. म्हणजेच नियमित पूर्ततेसाठी नव्हे, फक्त विशेष प्रसंगीच साधा गूळ वापरावा.

**लक्षात ठेवा:** केवळ कॅल्शियमच नव्हे तर फॉस्फरस, मॅग्नेशियम, कॉपर, झिंक, मँगनीज यांसारखी सर्व खनिजे प्रमाणात असणे गरजेचे आहे, ही सर्व खनिजे मिश्रणात असतात. लिक्विड कॅल्शियम हे केवळ तात्पुरत्या वापरासाठी योग्य आहे. रोजच्या वापरासाठी ते अनावश्यक असून शेतकऱ्यांचा खर्च वाढवते. त्यामुळे शेतकरी बांधवांनी जाहिरातींना बळी न पडता शास्त्रीय आहार नियोजनाद्वारे गायींची खरी गरज पूर्ण करावी.



### ५. आर्थिक तुलना:

लिक्विड कॅल्शियम → १०-१५ ₹ / गाय / दिवस

गूळ → ३-४ ₹ / १०० g


खनिज मिश्रण (५० g) → ~७-९ ₹

**सोपं गणित :**

खनिज मिश्रण = कमी खर्चात खरी कॅल्शियम पूर्तता

लिक्विड कॅल्शियम = फाजील खर्च

दुभत्या गायींच्या आरोग्य व दूध उत्पादनासाठी कॅल्शियम अत्यावश्यक आहे. परंतु, हिरवा व कोरडा चारा, पशुखाद्य आणि BIS-अनुमोदित खनिज मिश्रण यांचा समतोल वापर केल्यास रोजची गरज चांगल्या प्रकारे भागते.



# शासकीय पशुपैदास प्रक्षेत्र, ताथवडे प्रक्षेत्रावर विक्रमी चारा उत्पादन

मका पिकापासून १६३ टन मुरघासाची निर्मिती

## २०२५-२६ मध्ये ८० टक्के वाढ अपेक्षित



डॉ. ए. एस. आहेर
पशुधन विकास अधिकारी
प्रक्षेत्र व्यवस्थापक (अ.का.)
शासकीय पशु पैदास प्रक्षेत्र,
ताथवडे, पुणे-३३



**महाराष्ट्र पशुधन विकास मंडळाच्या शासकीय पशु पैदास प्रक्षेत्र, ताथवडे प्रक्षेत्रावर सन २०२१-२२ ते २०२४-२५ या कालावधीत चाऱ्याचे विक्रमी उत्पादन घेण्यात आले आहे. प्रक्षेत्रावरील पशुधनास यामुळे मुबलक चारा उपलब्ध झाला असून, शिल्लक चाऱ्यापासून मुरघास निर्मिती, तसेच किरकोळ ठोंबे विक्रीतून महसुली उत्पन्नातही भर पडत आहे. प्रक्षेत्रावर संकरीत नेपिअर, ऑस्ट्रेलियन रेड नेपिअर, डीएचएन ६ नेपिअर, बीएचएन १० नेपिअर, मका, ज्वारी, बाजरी, मेथी घास, दशरथ घास, सुबाभूळ, चवळी अशा विविध चारा पिकांचे उत्पादन घेण्यात येत असल्यामुळे पशुधनास सकस चारा उपलब्ध झाला आहे.**

महाराष्ट्र पशुधन विकास मंडळाच्या शासकीय पशुपैदास प्रक्षेत्राच्या अधिनस्त कृषि विभागाद्वारा चारा निर्मिती व व्यवस्थापनाचे काम पार पाडले जाते. या विभागामार्फत जमिनीची सुयोग्य मशागत करुन जमीन लागवडीयोग्य बनविणे, जास्तीत जास्त चारा उत्पादन घेणे, सेंद्रिय खते, स्थानिक स्रोत व अल्प भांडवल यांचा कौशल्यपूर्वक वापर करुन आदर्श पद्धतीने चारा लागवड व उच्च उत्पादन वाढ साधणे, वैरण पुरवठा साखळीमध्ये वाढ करणे, प्रक्षेत्रावर झालेले वैरण उत्पादन आवश्यकतेनुसार प्रक्षेत्रावरील व महाराष्ट्र पशुधन विकास मंडळांतर्गत इतर संस्थांना मागणीनुसार पुरवठा करणे, मका,ज्वारी, बाजरी या पिकांची प्राधान्याने लागवड व अतिरिक्त चारा उत्पादनातून मुरघास बनवणे. पशुपालकांना मागणीनुसार सुधारित जातीच्या नेपियर ठोंब्यांची विक्री व पुरवठा करणे आदी कामे पार पाडली जातात.

### शासकीय पशुपैदास प्रक्षेत्रावर लागवड करण्यात येत असलेल्या चारा पिकांची माहिती:

**सुपर नेपियर** (Pakchong Napier)

सुपर नेपियर पॉकचँग (Super Napier Pakchong-१) हे नेपियर गवताचं एक सुधारित व हायब्रीड वाण आहे, ज्याची उत्पत्ती थायलंडमध्ये झाली आहे. हे वाण बाजरी व नेपियर गवताच्या संकरणातून तयार करण्यात आले असून, त्याला "King of Napier" असेही म्हटले जाते. भारतात विशेषतः दूध उत्पादक शेतकऱ्यांमध्ये हे वाण प्रचंड लोकप्रिय होत आहे, कारण उत्पादन व पोषणमूल्य दोन्ही सामान्य गवतांपेक्षा खूपच जास्त आहे.

# शासकीय पशुपैदास प्रक्षेत्र, ताथवडे प्रक्षेत्रावर विक्रमी चारा उत्पादन



या गवताचं वैशिष्ट्य म्हणजे त्याचं अतिशय जलद वाढणं आणि दर ४०-४५ दिवसांनी कापणीस तयार होणं. एकदा लागवड केल्यावर ५ वर्षांपर्यंत हे गवत उत्पादन देत राहतं. पहिली कापणी लागवडी नंतर साधारणतः ७०-९० दिवसांनी होते. त्यानंतर दर दीड महिन्याला नवीन कापणी करता येते. योग्य खत व पाण्याच्या व्यवस्थापना सोबत सुपर नेपियर पॉकचॉंग एक एकरात वर्षाला सरासरी ९० ते १२० टन हिरवा चारा देतो, आपल्या कडे ही मात्रा १८० टनांपर्यंतही पोहचली आहे.

"हे" गवत प्रथिनयुक्त (crude protein ८-९ %) असून पचायला सुलभ आणि रसयुक्त असतं, त्यामुळे जनावरांना खूप आवडतं. हे चारा वापरल्याने जनावरांच्या दुधात वाढ होते, आणि दूध अधिक गडद आणि दर्जेदार बनतं. याला कीड व रोग कमी प्रमाणात लागतात, त्यामुळे देखभाल कमी लागते. या गवताचं एक महत्त्वाचं वैशिष्ट्य म्हणजे याच्या उत्पादनासाठी ठिबक सिंचन प्रणाली किवा इतर काही वेगळी प्रणाली लागत नाही. त्या मुळे कमी खर्चात अधिक चांगलं उत्पादन येतं.

हे गवत ठोंब द्वारे लावलं जातं आणि लागवडीचं पद्धत व वेव्यस्थापन अतिशय सोपे असून योग्य ते मार्गदर्शन घेतल्यास कुठला हि शेतकरी सहज त्याचे उत्पन्न काढू शकतो.

सारांशात सांगायचं झाल्यास, सुपर नेपियर पॉकचॉंग हे गवत शेतकऱ्यांसाठी एक फायदेशीर पर्याय असून कमी जागेत अधिक आणि दर्जेदार उत्पादन देणारं हे वाण आजच्या यांत्रिक व दुधाधारित शेतीसाठी अतिशय उपयुक्त आहे.








### प्रक्षेत्रावर जनावरांना दिला जाणं-या बहुविविध चारा प्रकार :

जनावरांच्या पोषणासाठी विविध प्रकारची चारा पिके घेतली जातात. उत्पादीत चारा त्याच्या पोषणमूल्यांनुसार व स्वरूपानुसार खालीलप्रमाणे विभागला जातो:

**१. हिरवा चारा (Green Fodder):** हिरवा चारा हा ताजा, रसयुक्त व पोषक असतो. यामध्ये पाण्याचे प्रमाण जास्त असते.

- ❖ उदा. नेपियर गवत, BHN १० गवत, DHN ६ गवत, ज्वारी, मका, बाजरी (हिरवा स्वरूपात), लुसर्न, बरसीम, चवळी, सूबाबुळ,शेवगा इत्यादी.
- ❖ अशी धान्यवर्गीय, द्विदलवर्गीय, गवतवर्गीय, आणि चारा झाडेदेखील आहेत.
- ❖ **फायदे:** पचनास सुलभ, थंड व पाण्याची गरज भागवतो.

**२. कोरडा चारा (Dry Fodder):** या प्रकारात सुकवलेला चारा येतो, ज्यात पाण्याचे प्रमाण कमी असते.

- ❖ उदा. ज्वारीचा वाळून केलेला कडबा, बाजरीचा कडबा.
- ❖ फायदे: दीर्घकाळ साठवून ठेवता येतो, भरपूर फायबर मिळतो.

**३. हे (Hay):** म्हणजे हिरव्या चाऱ्याचे नैसर्गिक पद्धतीने सुकवून बनवलेला कोरडा चारा.

- ❖ उदा. लुसर्न हे, बरसीम हे.
- ❖ शेत बांधावर, पिकांचा सऱ्या मधून खुरपणी करून काढलेले गवत, जंगली गवत सुकून देऊन हे तयार केला जातो.
- ❖ **फायदे:** साठवणूक सुलभ, हवामानानुसार वापर शक्य.

**४. मुरघास (Silage):** म्हणजे हिरव्या चारा हवाबंद पद्धतीने आंबवून तयार केलेला चारा.

- ❖ **फायदे:** दीर्घकाळ टिकतो, पौष्टिक, चाऱ्याची वर्षभर सुलभता.

**५. टोटल मिक्स राशन (TMR):**

TMR म्हणजे जनावराला द्यायचं एक संपूर्ण, संतुलित आणि प्रभावी खाद्य मिश्रण जे त्याच्या आरोग्य, दूध उत्पादन आणि एकूणच कामगिरीत वाढ करतं.

- ❖ हिरवा चारा - जसे की नापियर गवत व उपलब्द हिरवी वैरण ३०किलो - २०%
- ❖ सुका चारा - जसे की ज्वारी चा कडबा व उपलब्ध वाळलेली वैरण ७.५ किलो - ४६%
- ❖ पशु खाद्य -उपलब्ध प्रोटीनयुक्त गोळी पेंड ५ किलो - ३३%
- ❖ खनिज मिश्रण -मीठ + Mineral Mixtures & Supplements ५०० ग्राम - १%



### भविष्यातील नियोजन

- उच्च उत्पादनक्षम मका लागवड करून गुणवत्तापूर्ण ५० किलो पिशवीबंद मुरघास तयार करून विक्रीस उपलब्ध करणे.
- प्रक्षेत्रावरील गोमूत्राचा वापर करून, नैसर्गिक जीवामृत आकर्षक पॅकेजिंगमध्ये नागरिकांना विक्रीस उपलब्ध करून देणे.
- प्रक्षेत्रावरील अतिरिक्त शेणखताचा वापर करून गांडूळ निर्मिती प्रकल्प कार्यान्वित करणे व प्रक्षेत्र शेतीसह, नागरिकांस विक्रीकरिता उपलब्ध करून देणे.
- पशुखाद्याच्या गरजा लक्षात घेऊन बहुवर्षीय पिके कमी करत हंगामी चारा पिकांवर भर देत दूध उत्पादन वाढवण्याचा शाश्वत दृष्टिकोन अवलंबणे

## पशु पैदास प्रक्षेत्र, ताथवडे, पुणे - ३३ वैरण उत्पादन प्रागतिक नोंदणी

| सन | नेपियर, BHN१०, DHN६ (टन) | हंगामी (टन) | | | कडबा | एकूण | वाढ |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | मका | ज्वारी | बाजरी | | | |
| २०२१-२२ | १४६२ | २४४ | १५० | १०४ | ० | १९६० | - |
| २०२२-२३ | १७९८ | २०९ | १८९ | १५४ | ४४.५ | २३९४.५ | २२.१७% |
| २०२३-२४ | १९३६ | २४१ | १६६ | १९४ | ५५.५४ | २५९२.५४ | ३२.२७% |
| २०२४-२५ | २४०३ | ३०८ | १५९ | २०३ | ० | ३०७३ | ५६.७८% |
| २०२५-२६ एप्रिल ते जुलै २५ | १४५० | १८७ | ४० | - | - | - | ८०.००% वाढ अपेक्षित |



# जनावरांना औषधे देतांना घ्यावयाची काळजी






**डॉ. शिवानी रत्नाकर मुरळे**
पशुधन विकास अधिकारी (कं.)
राष्ट्रीय पशुधन अभियान (एनएलएम)
पशुसंवर्धन आयुक्तालय, पुणे-४११०६७

औषधांचा उपयोग रोग बरा करण्याकरीता, रोगप्रतिबंधक म्हणून व रोगाचे निदान करण्याकरीता होतो. आजार बरा करण्याकरीता पोषक आहाराला योग्य औषधाची जोड देणे अत्यंत गरजेचे असते. रोगाचे निदान जितके महत्वपूर्ण आहे, तितकीच औषधाची निवड देखील महत्वाची बाब आहे. औषधाची निवड जितकी बिनचूक तितक्याच लवकर रोगाला उतारा मिळतो.

औषधाची निवड व प्रमाण हे निरनिराळ्या घटकांवर अवलंबुन असते, जसे की, वय, लिंग, वजन, वेळ, औषधांचे गुणधर्म, वातावरण इत्यादी. या सर्व घटकांची काळजीपूर्वक निवड न केल्यास, औषधांचा गैरवापर केल्यासारखे होते.

१) औषधांची निवड जसे काळजीपूर्वक केली पाहीजे तसेच औषधांचा वापर करताना काही गोष्टी लक्षात घेतल्या पाहीजेत. औषधे वापरताना औषधाच्या निर्मितीची तारीख, टिकवण क्षमता, खराब होण्याचा कालावधी (Mfg & Exp.date) बघणे अत्यंत आवश्यक आहे. जर मुदत संपलेले औषध वापरले तर ते परीणामकारक ठरत नाही किंबहुना ते औषध शरीरावर विपरीत परीणाम करते.

२) औषधांची निवड व मात्रा वयानुरूप ठरवावी लागते. खूप वयस्कर व खूप लहान प्राणी औषधांची तीव्र मात्रा सहन करू शकत नाहीत, कारण लहान प्राण्यांमध्ये यकृत पुर्णपणे कार्यरत झालेले नसते व वयस्कर प्राण्यांमध्ये यकृताची कार्यक्षमता कमी झालेली असते. त्याचप्रमाणे काही विशिष्ट जातीतील प्राण्यांना जर एखाद्या औषधाचा उपचारार्थ उपयोग होत असेल, तर तेच औषध इतर जातीतील प्राण्यांना किंवा पक्ष्यांना उपयोगी ठरेलच असे काही नाही. किंबहुना ते घातकही ठरू शकते. उदा. डायक्लोफेनॅक सोडीयमच्या प्राण्यांमधील अतिरीक्त वापरामुळे घुबडांच्या अस्तित्वाला निर्माण झालेला धोका व त्यामुळे या औषधावर घालण्यात आलेली बंदी हे एक उत्तम उदाहरण इथे देता येईल. तसेच अॅट्रोपिन सल्फेट हे बाकी प्राण्यांमध्ये उपयोगी असले तरीही ते ससा या प्राण्यामध्ये उपयुक्त ठरत नाही.

३) काही औषधांची निवड व त्याची मात्रा लिंगपरत्वे भिन्न असते. उदा. नर प्राण्यांमधील टेस्टेस्टेरॉन या घटकामुळे औषधाचे प्रमाण नर प्राण्यांमध्ये मादीपेक्षा जास्त लागते.

४) काही औषधांचा परीणाम वेळेनुरूप बदलतो उदा. गुंगी आणणारी औषधे रात्रीच्या वेळी वापरली तर अधिक प्रमाणात परीणाम करतात तसेच दिवसा वापरली तर त्यांचा परीणाम कमी आढळुन येतो. त्यामुळे वेळेनुसार औषधांची मात्रा बदलावी लागते.

५) प्राण्यांच्या वजनानुरूप औषधांचा त्यांच्या शरीरावर परीणाम होतो. जास्त वजन असणाऱ्या जनावरांना वजनानुरुप मात्रा वाढवावी लागते. खूप कमी वजन असणाऱ्या अथवा आजारी प्राण्यांना त्यानुसारच औषधाची मात्रा द्यावी लागते, कारण त्यांची प्रतिकरशक्ती कमी असते. जसे की प्राण्यांमधील काही



घटक औषधांची निवड व प्रमाण ठरवताना लक्षात घ्यावे लागतात त्याचप्रमाणे औषधांचे गुणधर्मही लक्षात घ्यावे लागतात, उदा.

१) औषध कुठल्या स्वरूपात आहे द्रव,घन किंवा वायु या त्यांच्या स्थितीनुसार औषधांचा परीणाम शरीरावर दिसत असतो. द्रव किंवा वायु स्वरूपातील औषधे घन स्वरूपातील औषधांपेक्षा लवकर शरीरात मिसळली जातात.

२) खुप तिव्र औषध जसेच्या तसेच न देता त्याला सौम्य करून वापरावे लागते. काही आजारांमध्ये औषधासोबत काही इतर औषधे द्यावी लागतात, अशावेळी ही औषधे एकमेकांना पुरक असणे अत्यंत आवश्यक असते. अन्यथा निवडलेल्या औषधांपैकी एखादे औषध दुसऱ्याला मारक असण्याची शक्यता असते व अशा औषधांचा फायदा न होता नुकसानच जास्त होते. उदा. जेन्टामिसीन व पेनीसीलीन एकत्रीत देणे हितावह असते. परंतु, ऑक्सीटेट्रासायक्लीन व क्लोरॅम्फेनीकॉल ही औषधे एकत्रीत देऊ नयेत. औषधांची निवड चुकीची केल्यास औषधांचे दुष्परीणाम पहावयास मिळतात व औषधांचा वापर जर माफक असेल तर आरोग्य सुधारण्यास मदत होते. परंतु, अयोग्य वापर किंवा अतिरीक्त वापर दुष्परिणामास कारणीभूत ठरते. त्यामुळे औषधांचा वापर करताना खालील गोष्टी प्रामुख्याने लक्षात घ्याव्यात.

- ❖ आजारानुरूप औषधांची निवड ही महत्वाची बाब आहे अन्यथा त्याचा शरीरावर विपरीत परिणाम होतो.
- ❖ **औषधांचा अतिरीक्त वापर:** औषधांचे योग्य प्रमाण ही अत्यंत महत्वाची बाब आहे, अन्यथा जंतुंवर औषधांचा प्रभाव होत नाही. परीणामतः औषधे रोग निवारणास निकामी ठरतात.
- ❖ **औषधांचे प्रमाण:** प्रमाण ठराविक मात्रेपेक्षा कमी घेतल्यास औषधे परीणामकारक ठरत नाहीत तसेच औषध मध्येच बंद केल्यास जंतुंचे प्राबल्य वाढून रोगाचे प्रमाण वाढते, कारण औषधे किती दिवस घ्यावीत, याचा कालावधी ठरलेला असतो आणि तो पाळणे अत्यंत आवश्यक असते.
- ❖ दोन औषधे जेव्हा सोबत द्यायची असतात त्यावेळी योग्य व परस्परपुरक औषधांची निवड करणे गरजेचे असते, अन्यथा एक औषध दुसऱ्या औषधाला मारक ठरते अथवा विपरीत परीणाम घडवुन आणते. काही शेतकरी जनावर व्यायल्यावर स्वतःच कॅल्शीयम जनावरांस लावतात, जे की अत्यंत धोकादायक आहे. कुठलेही सलाईन पशुवैद्यकाकडूनच लावुन घ्यावे, कारण ते सलाईन शिरेतून देण्याची गती किती असावी, याचे योग्य ज्ञान त्यांना असते व काहीवेळा अशा सलाईनची शरीरात जाण्याची गती वाढल्यास हृदयाची गती वाढते, जनावर थरथर



जनावर थरथर कापते, जनावराचे अंग थंड पडते व जनावर शॉकमध्ये जाऊन दगावण्याची शक्यता असते.

६) बऱ्याचदा शेतकरी किंवा पशुपालक दवाखान्यात येऊन ऑक्सीटेट्रासायलीन देण्याची विनंती करतात किंवा कधी कधी स्वतःच देतांना आढळतात. परंतु, लहान जनावरांना ऑक्सीटेट्रासायक्लीन देऊ नये कारण हयाच्या वापरामुळे दात पिवळे पडणे, हाडे डिसुळ होणे, हाडांची योग्य वाढ न होणे असे विपरीत परीणाम दिसतात.

७) कधी कधी जनावरास पान्हा येत नाही, अशावेळेस शेतकरी ऑक्सीटोसीन हार्मोनचे (संप्रेरक) इंजेक्शन देतात व त्यामुळे पान्हा फुटण्यास मदत होते पण नियमीतपणे हे इंजेक्शन जनावरास देत राहील्यास जनावरांमध्ये तर दुष्परीणाम होतोच पण ही संप्रेरके दुधाद्वारे मनुष्याच्या शरीरात जाऊन मनुष्यास हानी पोहचवतात.

८) सहसा औषध दिल्यानंतर ते शरीरात शोषले जाते व ठरावीक अवयवापर्यंत पोहचून आपले कार्य साध्य करते व या प्रक्रीयेत औषधाचे रूपांतर दुसऱ्या कमी किंवा जास्त विषारी घटकात होते व ते मल, मुत्र आणि व्यायामाद्वारे शरीराबाहेर फेकले जाते. परंतु, काही घटक हे थोड्या थोड्या प्रमाणात शरीरात साठत जातात व काही दिवसांनंतर शरीरावर विपरीत परीणाम दर्शवतात. त्यामुळे औषधांचा सतत मारा करू नये.


९) गर्भारपणात काही औषधे टाळलेली बरे असतात कारण गाभण जनावरांतून ते होणाऱ्या वासरात किवा पिल्लामध्ये जाऊन जन्मजात विकृती निर्माण करतात.

१०) कोंबड्या व बकरीमध्ये वाढीसाठी जास्त प्रमाणात ॲन्टीबायोटीक्स दिली गेल्यास चिकन व मटणामध्ये ती येतात व मनुष्याने हे मटण सतत खाल्यास त्याचे विपरीत परीणाम दिसुन येतात. त्याचप्रमाणे अंड्यामध्येही असे ॲन्टीबायोटीक्सचे अंश दिसून येतात, जे आरोग्यासाठी घातक असतात.





# पशुधनातील गोचीडांचे प्रादुर्भाव व त्यांचे निर्मूलन






**डॉ. प्रणिता गंगाधर मंमोड**
पशुधन विकास अधिकारी
पशुवैद्यकीय दवाखाना श्रेणी-१ जामखेड
ता. अंबड जि.जालना

भारताच्या अर्थव्यवस्थेत पशुधन महत्त्वाची भूमिका बजावते. अन्नधान्याच्या मागण्या, उद्योगांसाठी कच्चा माल आणि ग्रामीण लोकांच्या रोजगाराच्या संधी पूर्ण करण्यात पशुपालनाचे मोठे योगदान आहे. पशुपालनाचा भारताच्या GDP मध्ये अंदाजे ४.११% आणि एकूण कृषी GDP मध्ये २५.६% योगदान असून ग्रामीण उपजीविकेतही ते महत्त्वपूर्ण भूमिका बजावते. पशुधन उत्पादनात पशूंचे आरोग्य आणि जनावरांचे रोग महत्वपूर्ण भूमिका बजावतात. पशुधन उत्पादनात संसर्गजन्य रोग आणि परोपजीवी मुळे होणारे आजार प्रमुख अडथळे निर्माण करतात.

पशुधानावर आढळून येणारे बाह्य परजीवी त्यांच्यावर विविध प्रकारचे हानिकारक परिणाम घडवू शकतात, ज्यामध्ये पशुधनाचे उत्पादन कमी होणे, विविध रोगांचा प्रसार होणे आणि ताणतणावाची पातळी वाढणे यांचा समावेश होतो. या परिणामांमुळे जनावरांचे आरोग्य आणि उत्पादकता कमी झाल्यामुळे शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान होते.

जनावरांच्या अंगावर आढळून येणाऱ्या बाह्य परजीवींपैकी गोचीडांचा प्रादुर्भाव ही एक महत्त्वाची समस्या आहे. गोचीडांच्या प्रादुर्भावामुळे पशुधनाचे रक्त कमी होणे, वजन कमी होणे, त्वचेचे नुकसान आणि रोगांचा प्रसार होतो त्यामुळे निरोगी आणि उत्पादक गुरांचे कळप राखण्यासाठी गोचीडांचे निर्मुलन करणे अत्यंत महत्त्वाचे आहे.

➢ **गोचीडाचे जीवनक्रम**

पशुधनांवरील गोचीडांचे प्रादुर्भाव नियंत्रित करायचे असेल तर त्यांचे जीवनक्रम जाणून घेणे खूप महत्त्वाचे आहे. गोचीडे आपल्या आयुष्यकाळात विविध प्रकारच्या जीवन अवस्थेमध्ये आढळून येतात. मादी गोचिड जनावरांचे रक्त शोषतात आणि खाली पडून सुरक्षित ठिकाणी एकावेळी हजारो अंडी घालतात. अंड्यामधून अळीसदृश लारव्हा बाहेर पडते, हे लारव्हा जनावरांच्या अंगावर चढते आणि रक्तशोषण करते आणि त्याची वाढ होते. दोन आठवड्यानंतर लारव्हा निम्फ अवस्थेमध्ये परिवर्तीत होते. या अवस्थेतही ते रक्त शोषण करतात, नंतर त्यांचे मोठ्या गोचीड अवस्थेमध्ये रुपांतरीत होते. यानंतर मोठे गोचीड जनावरांचे रक्त शोषन करून परत अंडी देतात. अशाप्रकारे त्यांची जीवनप्रक्रिया चालू असते. गोचीडांच्या वाढीसाठी आवश्यक असे तापमान व वातावरणातील आद्रता हि पावसाळी महिन्यात असते म्हणून प्रामुख्याने या महिन्यात गोचीडांचा प्रादुर्भाव जास्त प्रमाणात पाहावयास मिळतो.

### गोचीडांमुळे जनावरांवरील होणारे परिणाम

**१) विविध आजारांचा प्रसार**

गोचीडांमुळे विविध घातक आजारांचा प्रसार होतो. उदा. थँयलेरीयासिस, बबेसिओसीस, अँनाप्लाझमोसिस, लम्पी इत्यादी. या आजारांच्या प्रादुर्भावामुळे आर्थिक नुकसान पाहायला मिळते.

**२) रक्तक्षय (अनेमिया)**

गोचीड आपल्या वाढीसाठी जनावरांचे रक्त शोषतात. गोचीड जनावरचे साधारणतः एक ते दोन मीली रक्त दररोज पीत असते त्यामुळे जनावरांचे रक्त कमी होऊन त्यांना अनेमिया होतो .

**३) त्वचेची इजा**

गोचिड रक्त शोषत असताना जनावरांमध्ये अस्वस्थता निर्माण होते, तसेच जनावरांमध्ये खाज निर्माण झालेली पाहायला मिळते. यामुळे त्यांच्यात त्वचेची इजाही पाहावयास मिळते.



४) पैरालीसीस

गोचीडांच्या प्रादुर्भावमुळे जनावरांना 'टीक पॅरॅलिसिस' (Tick paralysis) नावाचा आजार जाडू शकतो, परिणामी, जनावरांची उत्पादनक्षमता (Productivity) कमी होते.

**जनावरांच्या सानिध्यातील वस्तू तसेच परिसरातून गोचिड निर्मुलन**

१. गोचिड प्रादुर्भाव झालेल्या गोठ्यातील शेण, मूत्र मिश्रित माती पूर्णपणे खरडून घ्यावी. त्यानंतर गोठ्यातील जमिनीवर चुना पावडर शिंपडावी.

२. गोठ्यातील जमिनीवर दिवसातील काही काळ ऊन पडेल आणि जमीन कोरडी राहिल, याचे नियोजन करावे.

३. जमिनीवरील दगड, विटा, मॅट इतर साहित्य उचलून त्याच्या खाली स्वच्छता करावी. गरम पाण्याने जमीन धुवून घ्यावी.

४. गोठ्यातील जमिनीवरील भेगा, खड्डे, छिद्र बुजवून वर नमूद केलेली रासायनिक आणि हर्बल गोचिडनाशकांचे द्रावण प्रभावी मात्रेमध्ये शिंपडावे.

५. गोठ्याच्या भिंतीला, गव्हाणीला चुना लावावा. भेगा, खड्डे, छिद्र बुजवावे. शक्य असल्यास भिंती आगीच्या साह्याने (फ्लेम गन) जाळून घ्याव्यात. तसेच वर नमूद केलेली रासायनिक आणि हर्बल गोचिडनाशक द्रावण प्रभावी मात्रेमध्ये फवारावे.

६. नवीन जनावर कळपात आणण्या अगोदर काही दिवस वेगळे बांधावे. निरोगी सिद्ध झाल्यावरच ते कळपात सोडावे.

७. नवीन जागेवर जनावर नेले असल्यास परत कळपात सोडण्याआधी गोचीड निर्मुलन करून सोडावे.

यासोबतच पशु व्यवस्थापनेत जनावरांचा आहार सकस आणि पूरक असावा, त्वचेचे आरोग्य राखण्यासाठी दैनंदिन खरारा करणे, त्यांना धुवून काढणे आणि स्वच्छ ठेवणेदेखील अतिशय महत्त्वाचे आहे. जनावरांना इतर आजार होऊन त्यांची प्रतिकारशक्ती कमी होऊ नये म्हणून सगळ्या आजारांचे प्रतिबंधात्मक लसीकरण करून घ्यावे.

**गोचीड निर्मुलन कसे करावे?**

गोचीड जनावरांच्या अंगावर वाढतात, परंतु त्यांचा जीवनक्रम पाहिला तर त्यामधील काही काळ ते जनावरांच्या शरीरापासून दूर सुरक्षित ठिकाणी जमीन किंवा भिंतीमध्ये लपून वाढतात. त्यामुळे नियंत्रण करत असताना फक्त जनावरावर उपचार करून भागात नाही तर जनावरांच्या सानिध्यातील वस्तू तसेच परिसरातून गोचिड निर्मुलन करणे देखील तितकेच महत्वाचे आहे.

**जनावरांच्या अंगावरील गोचीडांचे नियंत्रण**

गोचीड नियंत्रणासाठी विविध रासायनिक गोचिडनाशके वापरली जातात. विविध कंपन्यांची अनेकोत्तम गोचिडनाशके साध्या बाजारात उपलब्ध आहेत. त्यांचे योग्य मात्रेतील द्रावण पशुतज्ज्ञांच्या सल्याने जनावराच्या अंगावर फवारणे आवश्यक असते. गोचिडनाशकाचे प्रमाण कमी वापरल्यास ते निरुपयोगी तर जास्त प्रमाण वापरल्यास असुरक्षित सिद्ध होते. गोचिडनाशकांचा वापर प्रभावीपणे व्हावा, यासाठी गोचिडनाशके जनावरांच्या अंगावर power spray pump ने फवारावे, त्यानंतर जनावरांना गोठ्यापासून लांब नेऊन ब्रशचा वापर करून गोचिड काढून टाकावे. गोचिडनाशकांचा वापर करताना जनावरांचे तोंड, डोळे आणि नाक योग्य पद्धतीने झाकलेले असावे. गोचींडामध्ये गोचिडनाशकांसाठी प्रतिकार शक्ती निर्माण होऊ नये यासाठी गोचिडनाशकांचा वापर करत असताना त्यांचा प्रकार बदलत राहणे महत्वाचे आहे. तसेच बाजारात आता विविध वनस्पतीजन्य सुरक्षित गोचिडनाशकेदेखील उपलब्ध आहेत. यात निलगिरी तेल, कडूनिंब तेल, करंज तेल तसेच सीताफळाची पाने व बी वापरून बनवलेले कीटकनाशक यांचा समावेश होतो.



**गोचिड, गोमांशाचा करा नायनाट**
**तरच साध्य होईल दुग्धव्यवसायात भरभराट!**





**डॉ. सुनील देशपांडे**
पशुधन विकास अधिकारी
पशुवैद्यकीय दवाखाना (श्रेणी १)
कुडाळ तालुका जावळी
जिल्हा सातारा
**संपर्क: ९४२३८६५४५८**




# कहाणी लंपी चर्मरोगाची (भाग २)

**अक्कासाहेब:** डॉक्टरसाहेब, हा लंपी झालाय हे ओळखायचं कसं नक्की? म्हणजे लंपीची लागण आपल्या गाई बैलांना झाली असे, तर ह्याची काही नेमकी लक्षणं आहेत का?

**डॉक्टर:** हो. आहेत ना. या आजारामधे सर्वप्रथम जनावरांना सणकून ताप येतो. तीव्र स्वरुपाचा. पण त्याआधी बाधित झालेल्या जनावरांमधे या आजाराचा सुप्तकाळ साधारणपणे २ ते १४ दिवस असू शकतो. म्हणते या काळात विषाणू शरीरात असला तरी लक्षणे नंतर दिसतात.

**रखमा:** माझ्या कपिलीलाबी ताप आलाय ना डॉक्टरसाहेब?

**डॉक्टर:** हो ना.

**अक्कासाहेब:** आणखी ताप आल्यानंतर काय होते डॉक्टरसाहेब?

**डॉक्टर:** या लंपी आजारामधे सुरुवातीला तापाबरोबरच जनावरांच्या डोळ्यातून व नाकातून पाणी येते. चिकट स्राव येतो. लसिका ग्रंथींना सूज येते. दूध कमी होते. जनावराचं चारा खाणं-पिणं कमी होतं.

**रखमा:** ह्येचं तर समद होतंया माझ्या कपिलीला, डॉक्टरसाहेब.

**डॉक्टर:** बरोबर. जनावराच्या अंगावर हळूहळू १०-१५ मिलीमीटर व्यासाच्या गाठी दिसायला लागतात. प्रामुख्याने डोके, पाठ, मान, मायांग, कास आणि इतर भागाच्या त्वचेवर या गाठी दिसायला लागतात.

**अक्कासाहेब:** म्हणजे या गाठींवरून हा आजार ओळखता येतो ना डॉक्टरसाहेब?

**डॉक्टर:** बरोबर अक्कासाहेब, या गाठीला इंग्रजीत Lump (लंप) असे म्हणतात, त्याच्यावरुन या आजाराचे नाव Lumpy Skin Disease किंवा लंपी चर्मरोग असे ठेवले आहे.

**रखमा:** हम्म. म्हणजे या गाठीचं गोंधळ घालतात बहुतेक.

**डॉक्टर:** होय. या गाठी सुरुवातीला लहान आकाराच्या आणि संख्येने कमी असतात. परंतु, गाठींचा आकार व संख्या हळूहळू वाढू लागते. पुढे या गाठी फुटून त्यांच्यात जखमा होऊ शकतात. त्यांच्यात किवण किंवा किडे पडू शकतात. या गाठी उपचार केल्यावरही हळूहळू ओसरतात. जास्त प्रमाणात असतील तर काही महिनेही टिकून राहू शकतात. रोगाची ही बाह्यओळख आहे असे म्हणायला हरकत नाही.

**अक्कासाहेब:** तोंडात थोड्याशा जखमा दिसताहेत कपिलेच्या, डॉक्टरसाहेब.

**रखमा:** व्हय डॉक्टरसायेब, आम्ही बघत हुतो, जीभेला काटं आल्याती का? म्हणजी जीभंला काटं आल्यावरबी जनावर खात न्हाई ना म्हणून! तर तीच्या तोंडात थोड्या छोट्या जखमा दिसल्या.



**डॉक्टर:** होय. लंपी चर्मरोगाच्या लक्षणांमधील एक लक्षण म्हणजे तोंड, नाक आणि डोळ्यात व्रण निर्माण होतात. तोंडातील व्रणांमुळे आजारी जनावरांना साहजीकच चारा खायला त्रास होतो. रवंथ करायला त्रास होतो.

**अक्कासाहेब:** आणखी काय काय लक्षणं दिसतात, डॉक्टरसाहेब? म्हणजे तुम्ही उपचार सुरु केला म्हणल्यावर ती बरी होईलच. पण तरी रखमाच्या मनाची तयारी असावी. कारण आमची रखमा मूळात स्वभावाने हळवी! त्यात तिचा कपिलेवर खूप जीव आहे!

**डॉक्टर:** हो. खरे आहे. रखमाताईंची कपिला आहेच तितकी छान! बरं का अक्कासाहेब, काय होतं...डोळ्यातसुध्दा काही वेळा या व्रणांमुळे चिपडे येतात. डोळ्यांची दृष्टी बाधित होते. पापण्या चिकटून बसल्यामुळे.

**अक्कासाहेब:** डॉक्टरसाहेब आणखी काय काय होतं?

**डॉक्टर:** लंपी आजारामधे या लंपी विषाणूच्या अवकृपेमुळे शरीरातील अनेक अवयवीवर आघात होतो. जनावराला श्वासाचा आजार होऊ शकतो. ज्याला आपण फुफ्फुसदाह किंवा न्युमोनिया म्हणतो, तो. त्यामुळे जनावराला श्वास घ्यायला त्रास होतो आणि धाप लागायला लागते

**रखमा:** बरं. बरं.

**डॉक्टर:** हो. आणि स्तनदाह किंवा मस्टायटिस आजाराची बाधा देखील होऊ शकते. कास कडक होणे. सड सूजणे. दूध कमी होणे. सडांमधून दूधाऐवजी पाणी येणे; असे काही काही होऊ शकतं!

**अक्कासाहेब:** दूध कमी होणे, बंद होणे म्हणजे रखमाच्या रतीबांची खोटीच की!

**डॉक्टर:** हो खरंय. पण तिथपर्यंत आपण हा आजार वाढणार नाही याची आपण काळजी घेऊया की.

**रखमा:** व्हय, डॉक्टरसायेब! तुमी कपिलेला हात लावला, चार सूया मारल्या की व्हतीया ती बरी!

**अक्कासाहेब:** (हसून) अगदी खरंय! 'वैद्यो नारायणो हरी' असे आपल्याकडे म्हणतात ते उगीच नाही. डॉक्टर हे देवाचे दूत असतात, आजार बरे करायला पाठवलेले!

**डॉक्टर:** (हसून) अहो, तसे काही नाही. आमचे शास्त्र आम्हाला तयार करते आणि कुठल्या आजारासाठी कुठले उपचार करावे हे सुचणे हे महत्त्वाचे. ते सुचविण्याचे काम आमचा अभ्यास, अनुभव देत असतो. अर्थात ही सर्व "त्याची" कृपा आहेच!

(क्रमशः)



पशुसंवर्धन आयुक्तालय,
महाराष्ट्र राज्य, पुणे - ४११०६७



शौर्य, शांती, समता व समृद्धीचे प्रतिक असलेला तिरंगा झेंडा आपल्या भारत देशाचा अभिमान आहे. ७९ व्या स्वातंत्र्यदिनी पशुसंवर्धन आयुक्तालयाच्या प्रांगणात तिरंगा असा डौलाने फडकला आणि 'आम्ही भारताचे लोक' हा राष्ट्राभिमान उपस्थितांमध्ये वृद्धींगत झाला.

(छाया: आकाश चव्हाण)


प्रकाशक: पशुसंवर्धन विभाग,
महाराष्ट्र राज्य

**पशुसंवर्धन आयुक्तालय,**
महाराष्ट्र राज्य, पुणे - ४११०६७